अहवाल क्रमांक : १९६

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**वर्धा जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# तिसरा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई.
२०२६

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

वर्धा जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# तिसरा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०२४-२०२५)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. सुरेश धस, वि.स.स.

(३) श्री. महेश लांडगे, वि.स.स.

(४) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(५) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(६) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(८) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स.

(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(१०) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(११) श्री. निलेश राणे, वि.स.स.

(१२) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.

(१३) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स.

(१४) श्री. किरण लहामटे, वि.स.स.

(१५) श्री. विजयसिंग पंडित वि.स.स.

(१६) श्री. नितीन पवार, वि.स.स.

(१७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१८) श्री. नितीन देशमुख, वि.स.स.

(१९) श्री संजय मेश्राम, वि.स.स.

(२०) श्री. संदिप क्षिरसागर, वि.स.स.

(२१) डॉ. परिणय फुके, वि.प.स.

(२२) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(२५) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(२६) श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.

(२७) * डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.

(२८) ** श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव-४

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

(२७) * डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १९ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

(२८) ** श्री. सदाशिव खोत, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक २१ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

# पंचायती राज समिती

## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रामुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स.

(४) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे वि.स.स.

(१३) ***रिक्त**

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) ****श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.**

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(२१) *****रिक्त**

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर,वि.प.स.

(२४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) ******रिक्त**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

***डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.** यांचा दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

****डॉ. संजय कुटे, वि.स.स.** यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर **श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.** यांची **" समिती सदस्य "** म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

*****श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** यांची मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद, विरोधी पक्ष नेते पदी निवड केल्यामुळे रिक्त.

******श्री. सदाशिव खोत, वि.प.स.** यांची विधानपरिषदेवरील सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी संपुष्टात आल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर,, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) *****रिक्त**

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) *****रिक्त**

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

* **श्री. किशोर दराडे, वि.प.स.** यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** **श्री. निलय नाईक, वि.प.स.** व **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.** यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** **डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.** व **प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.** यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**(प्रस्तावना)**

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा तिसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता समिती दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट्य असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका

सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेवून कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने वर्धा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने वर्धा जिल्हा परिषदेस दिनांक ८, ९ व १० ऑगस्ट, २०१८ रोजी भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी आणि सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, वर्धा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी विभागाचे अपर मुख्य सचिव, जिल्ह्यातील संबंधित अधिकारी, मंत्रालयीन सह सचिव व उप सचिव व संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या वर्धा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२०२६ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १८ मार्च, २०२६.

**संतोष दानवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | पंचायती राज समितीच्या बैठकीस अधिकारी अनुपस्थित राहिल्याबाबत (पंचायत समिती, हिंगणघाट) | १ |
| (२) | दोन | सायकलींचे वाटप विलंबाने केल्याबाबत (पंचायत समिती, समुद्रपूर) | ५ |
| (३) | तीन | नोंदवह्या अद्ययावत न ठेवल्याबाबत (पंचायत समिती, देवळी) | ७ |
| (४) | चार | सहाय्यक अध्यापक यांचे विरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत (पंचायत समिती, वर्धा) | १० |
| (५) | पाच | १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविल्याबाबत (पंचायत समिती, वर्धा) | १२ |
| (६) | सहा | राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (पंचायत समिती, आर्वी) | १४ |
| (७) | सात | उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत इयत्ता ८ वी चा वर्ग सुरू केल्याबाबत (पंचायत समिती, कारंजा) | १८ |
| | | परिशिष्ट “अ” शासन निर्णय व परिपत्रके | २३ |
| | | परिशिष्ट “ब” समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ३७ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, वर्धा

## पंचायती राज समितीच्या बैठकीस अधिकारी अनुपस्थित राहिल्याबाबत

## (पंचायत समिती, हिंगणघाट)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, बैठकीला बोलावूनही किती अधिकारी उपस्थित झालेले नाहीत ?

यावर गट विकास अधिकारी पंचायत समिती, हिंगणघाट यांनी विशद केले की, १६ अधिकारी उपस्थित झालेले नाहीत. याबाबत समितीने निदेश दिले की, ज्या अधिकाऱ्यांनी अनुपस्थितीबाबत कळविलेले नाही त्यांच्याकडून खुलासा घेण्यात यावा. समितीला गांभीर्याने घेतले जात नसेल तर ते योग्य नाही. तेव्हा संबंधितांवर नियमानुसार जबाबदारी निश्चित करून त्यांची वेतनवाढ रोखावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समितीच्या बैठकीस अधिकारी अनुपस्थित राहिल्याबाबत (पंचायत समिती, हिंगणघाट) :—**

पंचायती राज समितीची बैठक आयोजित करण्यात आल्याचे कळविण्यात आलेले असतानाही पंचायत समिती, हिंगणघाट येथील १६ अधिकाऱ्यांनी अनुपस्थितीबाबत न कळविल्याप्रकरणी संबंधितांचा खुलासा घेण्यात आला आहे काय, असल्यास नियमानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीच्या बैठकीस दिनांक ९/०८/२०१८ रोजी पंचायत समिती, हिंगणघाट येथे १६ अधिकारी अनुपस्थित होते, त्यापैकी एक अधिकारी (श्री. भास्कर विठ्ठल खडतरकर, कनिष्ठ अभियंता) हे दिनांक १९/०१/२०१८ ला मयत झालेले आहेत ते आणि ९ अधिकारी हे दिनांक ९/८/२०१८ पूर्वी सेवानिवृत्त झालेले आहे :—

| अ. क्र.<br>(१) | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव<br>(२) | सेवा निवृत्ती दिनांक<br>(३) |
|---|---|---|
| १. | श्री. भाऊराव मंगळू मेघावत, तत्का. गटविकास अधिकारी | ३१/०१/२०१८ |
| २. | श्री. प्रकाश दुर्योधन मांडवे, तत्का. गटविकास अधिकारी | ३१/०७/२०१८ |
| ३. | श्री. प्रकाश दुर्योधन मांडवे, तत्का. बालविकास प्रकल्प अधिकारी | ३१/०७/२०१८ |
| ४. | डॉ. एस. वाय. पाटील, तत्का. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | ३१/१०/२०१७ |
| ५. | श्री. एच. एन. पानसे, तत्का. उपअभियंता लघुसिंचन | २८/०२/२०१८ |
| ६. | सौ. रेखा लक्ष्मीकांत मारोटकर, तत्का. बालविकास प्रकल्प अधिकारी | ३१/०३/२०१७ |
| ७. | श्री. हरिहर पेंदामकर, तत्का. गटशिक्षणाधिकारी | २८/०२/२०१६ |
| ८. | श्री. बुद्धम कांबळे, तत्का. विस्तार अधिकारी (शि) | ३१/१०/२०१४ |
| ९. | श्री. ए. ए. जगशेट्टीवार, तत्का. उप अभियंता बांधकाम | ३०/०९/२०१५ |

उर्वरित सहा अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आलेला आहे.

१. श्री. सी.जी. चव्हाण, तत्कालीन गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात, सदर वित्तीय वर्षात पंचायत समिती, आर्वी येथील सुद्धा गटविकास अधिकारी पदाचा प्रभार असल्यामुळे ते पंचायत राज समितीच्या बैठकीस पंचायत समिती आर्वी येथे उपस्थित होते. त्यामुळे कारवाई करण्यात येऊ नये.

२. श्री. अशोक जगशेट्टीवार, तत्कालीन उप अभियंता, जि.प. (बांधकाम), उप विभाग हिंगणघाट यांनी त्यांचे खुलाशात, कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम विभाग त्यांना दिलेल्या पत्रानुसार ते दिनांक ०८/०८/२०१८ ते १०/०८/२०१८ पर्यंत पंचायती राज समितीकरिता वर्धा मुख्यालयात उपस्थित होते, त्यामुळे कारवाई करण्यात येऊ नये.

३. श्री. अमृत बालपांडे, तत्कालीन उप विभागीय अभियंता, जि.प. लघुसिंचन विभाग यांनी त्याचे स्पष्टीकरणात, त्याचे आईचे ऑपरेशन असल्यामुळे ते आधीच रजा मंजूर करून रजेवर होते. त्यामुळे कार्यवाही करण्यात येऊ नये.

४. श्री. महेंन्द्र गहेरवार, तत्कालीन सहाय्यक लेखा अधिकारी यांनी त्याचे स्पष्टीकरणात त्यांना मुख्य लेखा अधिकारी तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी त्यांना पंचायती राज समितीच्या बैठकीच्या वेळी दिनांक ८/०८/२०१८ ते १०/०८/२०१८ पर्यंत वित्त विभाग, जिल्हा परिषद, वर्धा येथे उपस्थित राहण्याचे आदेश केल्यामुळे ते दिनांक ९/०८/२०१८ रोजी पं.स., हिंगणघाट येथे उपस्थित राहू शकले नाहीत. तथापि ते सदर कालावधीत जि.प. वर्धा कार्यालयात उपस्थित होते.

५. श्री. अशोक रा. पिट्टलवार, विस्तार अधिकारी (शिक्षण) हे समुद्रपूर येथे शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी (शिक्षण) पद रिक्त असल्याने गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेनुसार पंचायती राज समितीच्या बैठकीस समुद्रपूर येथे उपस्थित होते.

६. श्री. अशोक न. गिदेवार, तत्कालीन विस्तार अधिकारी (शिक्षण), हे पंचायत समिती, आर्वी येथे कार्यरत असून पंचायती राज समितीच्या बैठकीस आर्वी येथे उपस्थित होते. त्यामुळे ते हिंगणघाट येथे उपस्थित राहू शकले नाही.

७. डॉ. प्रभाकर नाईक तत्कालीन तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी त्याचे स्पष्टीकरणात ते दिनांक १/७/२०१८ ते २०/१०/२०१८ पावेतो Infective Hepatities and Malabsorption या आजाराने ग्रस्त असल्याने ते पंचायती राज समितीच्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाही.

त्यामुळे वरिल बाबी विचारात घेऊन संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समितीच्या बैठकीस अधिकारी उपस्थित राहत नाहीत, हा विषय केवळ वर्ध्यापुरता मर्यादित नाही हा संपूर्ण राज्याचाच विषय आहे. संपूर्ण राज्यामध्ये कुठेही पाहिले तर समितीच्या बैठकीस विभाग प्रमुख उपस्थित राहत नाहीत, यासंदर्भातील समितीस माहिती देण्यात यावी. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ज्यावेळेस समितीने तेथे भेट दिली, त्यावेळेस १६ अधिकारी उपस्थित नव्हते. त्या प्रत्येकाने अनुपस्थितीचे कारण नमूद केलेले आहे. काही लोक अन्य व्यवस्थांचे काम पाहत होते. काही मुख्यालयाला हजर होते. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विदित केली की, त्यातील ४-५ जण सेवानिवृत्त झालेले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, पंचायती राज समितीने पंचायत समिती, हिंगणघाट येथे भेट दिली त्यावेळेस अधिकारी उपस्थित नव्हते. सर्वसाधारणपणे पंचायत समितीच्या एखाद्या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी (डी.एच.ओ.), एखाद्या बैठकीस जिल्हा शिक्षण अधिकारी (इ.डी.ओ.) एखाद्या बैठकीस शिक्षण अधिकारी (इ.ओ.) अशा प्रकारे दोन महिन्यातून एकदा रोटेशनने अधिकारी उपस्थित राहिले पाहिजेत. एचओडी व अन्य विभाग प्रमुखांनी ठरवून दिलेल्या तारखेस बैठकीस उपस्थित राहिले पाहिजेत. कुठलेच अधिकारी बैठकीस उपस्थित राहत नाहीत मग निर्णय कोण घेणार, बुकलेटमध्ये बैठकीस अधिकारी का उपस्थित नव्हते त्याची कारण नमूद केली आहेत, परंतु, सामान्यपणे रोज जे निदर्शनास येते त्याबाबत समितीस अवगत करण्यात यावे. यावर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी स्पष्ट केले की, दुसऱ्या जिल्ह्याच्या पंचायती राज समितीच्या साक्षीमध्ये देखील हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. समितीने या संदर्भात सूचना दिली होती. त्यानंतर विभागाने जिल्हा परिषदेला २ गोष्टींचे रोस्टर तयार करण्यास सांगितले आहे. त्यावेळेस मोठ्या जिल्ह्यात बऱ्याच पंचायत समितीची बैठक एकाच तारखेला होती. आम्ही ते त्यांना बदलण्यास लावले. त्याचेही रोस्टर तयार केलेले आहे. आता पंचायत समितीने जे काही

१४-१५ विभाग प्रमुख आहेत त्या प्रत्येकाचे रोस्टर ठरवून दिलेले आहे. गेल्या दीड वर्षांपासून तर बैठका बंदच होत्या. काही बैठका व्ही.सी.द्वारे अटेंड केल्या गेल्या. परंतु, आता फिजिकल बैठका सुरू झालेल्या आहेत. एखाद्या अधिकाऱ्याला बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसेल तर ते व्ही.सी.द्वारे उपस्थित राहतील. यापुढे आम्ही काळजी घेत आहोत की, प्रत्येक पंचायत समितीच्या बैठकीस एखादे खाते प्रमुख उपस्थित राहतील. यावर असे समितीने निदेश दिले की, व्हिजिट केल्यानंतर काही अडचणी जाणवल्या तर त्याबाबत शेरा नोंदवहीत नोंद करण्यात यावी. त्याबाबत संबधितांना सूचना देण्यात याव्यात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शवली. तद्नंतर अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अधिकची माहिती विदित केले की, समितीने या संदर्भात दिलेल्या सूचना ३४ जिल्हा परिषदांना कळविलेल्या आहेत.

समितीने सूचित केले की, सर्वसाधारणपणे आमदार वर्षातून एकदा आमसभा घेतात. ती वेळेवर घेतली जात नाही तर त्याबाबत १५ ते २० दिवस अगोदर माहिती दिली जाते. आमसभेचा उद्देश असा आहे की, राज्य सरकार व जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमध्ये समन्वय असला पाहिजे. पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेचे जे प्रश्न आहेत ते आमदारांमार्फत सरकारकडून सोडवले पाहिजेत हा त्यामागचा उद्देश आहे. परंतु, त्या बैठकीस डिस्ट्रीक्ट हेड उपस्थित राहत नाहीत. त्या संदर्भात आपण गाईडलाईन्स दिल्या पाहिजेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस हिंगणघाट पंचायत समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले असतानाही १६ अधिकारी अनुपस्थित होते. समितीच्या कामकाजाला गांभिर्याने घेतले नसल्याने या संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासे घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व समितीस अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून समितीस सादर करण्यात आलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, एक अधिकारी दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी मयत झाले असून ९ अधिकारी हे दिनांक ०९ ऑगस्ट, २०१८ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहे. एक अधिकारी त्यांच्या आईची शस्त्रक्रीया असल्यामुळे व अन्य एक अधिकारी स्वतः आजारी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही. पाच अधिकारी समितीच्या कामकाजासाठी अन्य पंचायती समितीच्या बैठकीस उपस्थित होते. त्यामुळे या सर्व बाबी विचारात घेऊन संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

पंचायती राज समितीच्या बैठकीस अधिकारी उपस्थित राहिले नसल्याबाबतची बाब गंभीर स्वरूपाची असल्याने याबाबतची अधिक माहिती घेण्यासाठी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीत हिंगणघाट पंचायत समितीस भेट देऊन घेतलेल्या बैठकीस अधिकारी उपस्थित न राहिल्याबाबत यासह पंचायती समितीच्या बैठकीस विभाग प्रमुख उपस्थित राहत नाही. तसेच वर्षातून एकदा होणाऱ्या आमदारांच्या आमसभेसही अधिकारी उपस्थित राहत नसल्याबाबत समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. यावर विभागीय सचिवांकडून देण्यात आलेले स्पष्टीकरण संयुक्तिक नव्हते.

पंचायती राज समिती जिल्ह्यास भेट देत असताना तालुका स्तरावरील पंचायत समितींना भेटी देऊन शाळा व शालेय/पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाने, वसतीगृह, ग्रामीण रस्ते, जलसिंचनाची व पाणीपुरवठयांच्या कामांची पाहणी करून पंचायत समित्यांच्या ज्या कामांबाबतीत दोष आहेत त्या सुधारणा करून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना करते. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितींना किती भेटी दिल्या, विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेस उपस्थित राहिले होते काय, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्रांची तपासणी केली आहे काय, शिक्षण अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन शैक्षणिक दर्जासह तेथील सोयी सुविधांची पाहणी केली आहे काय याबाबतची माहिती समिती प्राप्त करून घेते. त्याचप्रमाणे महिला व मागासवर्गीयांसाठी प्राप्त झालेला निधी त्याच वित्तीय वर्षात खर्च केला आहे काय, वैयक्तिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ विहित वेळेत दिला आहे काय यासह सर्व वित्तीय खर्चाची तपासणी समितीकडून करण्यात येते. परंतु हिंगणघाट पंचायत समितीस भेट दिली असता अधिकारी उपस्थित न राहिल्याने समितीचे उपरोक्त प्रमाणे कोणतेही काम होऊ शकले नाही. वास्तविक समितीची जिल्ह्यास भेट व बैठकीसंदर्भात या सचिवालयाकडून कळविण्यात येते त्याचवेळी समितीच्या बैठकीस उक्त अहवाल वर्षातील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात येते. त्यानुसार तालुका निहाय पंचायत समितीच्या कामकाजासाठी अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. **समितीने हिंगणघाट पंचायत समितीस भेट देऊन घेतलेल्या बैठकीस अधिकारी उपस्थित न राहिल्याची बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून समितीचे कामकाज गांभीर्याने न घेतल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

तसेच तालुकास्तरावर पंचायत समितीमार्फत वर्षातून एकदा आमदारांची आमसभा घेण्यात येते. राज्य शासन, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांमध्ये समन्वय रहावा व जिल्हा परिषदांसह पंचायत समित्यांकडून राबविण्यात येणाऱ्या योजना, योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी, त्यासाठी आवश्यक असलेला निधी यासह या संस्थांचे अनेक महत्त्वाचे विषय आमदाराच्या माध्यमातून राज्य शासनाकडे पोहचविणे व त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने आमसभा आयोजित करण्यात येते. या आमसभेस ग्रामपंचायतीचे सरपंच, सहकारी संस्थाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व सर्व सामान्य नागरिक उपस्थित राहून त्यांचे प्रश्न मांडतात. त्यावर चर्चा होऊन समस्यांचे निराकरण होऊ शकते. **परंतु या आमसभेसही विभाग प्रमुखांसह अन्य अधिकारी उपस्थित रहात नसल्याने आमसभा आयोजित करण्याची फलनिष्पती होत नसल्याने याबाबतही समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**संसदीय कामकाज प्रणालीमध्ये विधिमंडळाच्या समितीचे स्थान व त्यांच्या कामकाजाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उंचविण्यासाठी "पंचायती राज समितीच्या जिल्हास्तरीय बैठकांना तसेच आमदारांच्या आमसभेला विभाग प्रमुखांसह अन्य अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याबाबत अनिवार्य करण्यात यावे अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल" यासंदर्भातील परिपत्रक विभागाकडून काढून संबंधितांना उपस्थित राहण्याबाबत आदेशित करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, वर्धा

### सायकलींचे वाटप विलंबाने केल्याबाबत (पंचायत समिती, समुद्रपूर)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांना गंज लागलेल्या सायकलींचे विलंबाने वाटप करण्यात आले. यात लाभार्थ्यांची यादी कोणी निश्चित केली, वाटपाचे आदेश कोणी काढले, विलंबाने वाटप झाले यास कोण जबाबदार आहे, या संदर्भात विस्तार अधिकारी यांचा खुलासा घ्यावा. या प्रकरणात चौकशी करून समितीला एक महिन्यात अहवाल पाठवावा. यावर विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी स्पष्ट केले की,ती खरेदी आम्ही केली नाही. यावर समितीने विचारणा केली की, वाटप करण्याची जबाबदारी आपली होती. विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी समितीस विदित केले की, जेवढे साहित्य प्राप्त झाले त्याचे वाटप केलेले आहे. यावर समितीने निदेश दिले की, गंजलेल्या सायकलींचे वाटप करण्यात आले अशी वर्तमानपत्रात आलेली बातमी चुकीची आहे काय, लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचे काम या अधिकाऱ्यांकडून झालेले आहे. तेव्हा या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून नियमाप्रमाणे कारवाई करावी, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

पंचायत समिती, समुद्रपूर येथे लाभार्थ्यांना गंज लागलेल्या सायकलींचे विलंबाने वाटप करण्यात आल्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

होय, (प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे.)

श्री. एस. के. हेडाऊ, वि.अ. (पं) पं.स., समुद्रपूर यांना या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.जिपव / ग्रापं / स्था-२ / डिई / वशि-१०६०/१८ दि. ३१/१०/२०१८ अन्वये त्यांचेविरुद्ध आरोप क्र.१ ते १२ चे अनुषंगाने खुलासा विचारण्यात आला असता त्यांनी दिनांक २४/१२/२०१८ नुसार आरोप निहाय सविस्तर खुलासा सादर केलेला असून त्यासोबत पुरावे जोडलेले आहे त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या खुलाशाची व प्राप्त पुराव्याची शहानिशा पहाणी अभ्यास केला असता श्री. एस.के.हेडाऊ, वि.अ. (पं) यांनी सादर केलेले स्पष्टीकरण व दस्तऐवज पूर्ण आरोपाचे खंडण करण्याइतपत पुरेसे आढळून न आल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे ज्ञापन जोडपत्र एक ते चारसह पत्र क्र.जिपव /ग्रापं/स्था-२/डिई/वशि-८५/२०१९, दिनांक १७/१/२०१९ बजावण्यात आलेले असून त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

संबंधिताविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आलेली असून चौकशी अधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार व त्यांचे निष्कार्षाचे अनुषंगाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय.—** संबंधीत मुद्दा ग्रामविकास विभागाशी संबंधित असल्याने शासन पत्र दि. १९ मार्च, २०१९ नुसार हस्तांतरित करण्यात आले.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे आणि संबंधितांना शिक्षा देखील झालेली आहे. समितीने अशीही विचारणा केले की, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई केलेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे व त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थांबवल्या आहेत. २ लाख ३५ हजार रुपयांची अपहारित रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली. त्यावेळेस समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, समुद्रपूर येथे लाभार्थ्यांना गंज लागलेल्या सायकलीचे विलंबाने वाटप करण्यात आले असून याबाबतची बातमी वर्तमानपत्रात आली आहे. याअनुषंगाने या लाभार्थ्यांची यादी कोणी निश्चित केली, सायकल वाटप करण्याचे आदेश कोणी काढले व विलंबाने वाटप झाले याला कोण जबाबदार आहे. याबाबतची चौकशी करून संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याचे आदेश समितीने दिले. त्यानुसार जिल्हा परिषदेने सादर केलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, श्री. एस. के. हेडाऊ, वि.अ. (पं) पं.स. समुद्रपूर यांची विभागीय चौकशी करून त्यांची दोन वेतनवाढी कायमस्वरूपी थांबविण्यासह त्यांच्याकडून २ लाख ३५ हजार रुपयांची अपहारित रक्कम वसूल करण्यात आली आहे. या प्रकरणासंदर्भात संबंधितावर केलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

तथापि, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर सायकलचे वाटप करणे या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात विहित कालावधीत सायकलींचे वाटप केले असते तर त्यांना शाळेत जाणे सोईचे झाले असते व त्यामुळे ग्रामीण भागातील शालेय गळतीचे प्रमाण कमी झाले असते. या योजनेंतर्गत लाभार्थी हिस्सा न भरता पूर्णतः मोफत सायकलींचे वाटप करावयाचे असतानादेखील पंचायत समिती, समुद्रपूर येथे विलंबाने सायकलींचे वाटप केल्यामुळे या योजनेचे उद्दिष्ट सफल होऊ शकले नाही.

**जिल्हा परिषदेच्या स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी याबाबतची मुदत शासन निर्णयान्वये शासनाने दिलेली असतानाही या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने वैयक्तिक लाभाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचत नाही व लाभार्थ्यांना लाभ विहित वेळेत मिळत नाही. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये शासनाप्रती नाराजी निर्माण होऊन शासनाची प्रतिमा मलीन होत आहे. यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये साहित्यांचे वाटप योग्य पद्धतीने व्हावे असे समितीचे मत आहे.**

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील व मागासवर्गीय लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभांच्या योजनांचे लाभ देत असताना सदर योजनेची फलश्रुती होण्यासाठी जिल्हा परिषदांनी व त्यांच्या विषय समित्यांनी आणि विभागप्रमुखांनी या योजनांचा आढावा घेऊन मूल्यमापन करणे आवश्यक आहे. असे मूल्यमापन संबंधित खातेप्रमुखांकडून दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर माहे एप्रिल/मे महिन्यापर्यंत करून या मूल्यमापनाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी व विषय समित्यांच्या सभापतींना सादर करणे आवश्यक आहे अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. **या कार्यपद्धतीनुसार योजनांवर काम होण्यासाठी संबंधितांना सक्त सूचना देण्यात याव्यात व यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, वर्धा

### नोंदवह्या अद्ययावत न ठेवल्याबाबत (पंचायत समिती, देवळी)

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, वर्धा, दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीतील भेटीदरम्यान समितीने दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी पंचायत समिती, देवळी येथे भेट दिली असता, सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांना अशी विचारणा केली की,लेखा संहितेच्या नियम २३ प्रमाणे बांधकामाचे प्रगतीपुस्तक ठेवण्यात आले आहे काय, पंचायत समितीमध्ये नोंदवह्या ठेवण्यात आल्या आहेत काय, किती महिन्यांपर्यंत नोंदवही ठेवावी लागते याची माहिती आहे काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांनी समितीस विदित केले की, याबाबत मला माहिती नाही. यावर समितीने गटविकास अधिकारी यांना सूचना केली की, नोंदवह्या पंचायत समितीचे महत्त्वाचे दस्तऐवज असतात, त्याबाबत आपणाला माहिती नाही ही बाब योग्य नाही. कोणत्या हेडवर किती पैसा आला, किती पैसा खर्च झाला याच्या सर्व नोंदी ठेवण्यात याव्यात. दर तीन महिन्यांतून एकदा विषय समितीसमोर नोंदवह्या ठेवल्या पाहिजेत. यावर गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, देवळी यांनी विदित केले की, लेखा व्यवहाराची नोंदवही विषय समितीसमोर ठेवण्यात येते. समितीने गटविकास अधिकारी यांना विचारणा केली की, वार्षिक लेखे व जमाखर्चाला विरोध केला तर एक रुपयादेखील खर्च करता येत नाही. पंचायत समितीचा खर्च नियमाप्रमाणे करावा लागतो. खर्चाच्या नोंदवहीवर सभेने आक्षेप घेतला तर ते सिद्ध करून दाखवावे लागते. सरपंच यांचे आर्थिक अधिकार काढलेले नाही. आर्थिक व्यवहार करताना मंजुरी घेतल्याशिवाय काहीच करता येत नाही. पंचायत समितीच्या नोंदवह्या, १४ वा वित्त आयोगाचा निधी, पंचायत समितीच्या संहितेच्या नियमानुसार कार्यवाही करावयाची असते. नियम २३ प्रमाणे नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नाहीत. विविध योजनांच्या कामांचा तपशील देण्यात आलेला नाही. सदर कामे अपूर्ण आहेत की, प्रगतीपथावर आहेत याची नोंद ठेवण्यात आलेली नाही. पंचायत समितीच्या सर्व प्रकारच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात आल्या आहेत काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांनी समितीस विदित केले की, लेखा विभागाच्या नोंदवह्या दरमहा सभेसमोर ठेवण्यात येतात.

समितीने पुढीलप्रमाणे सूचना केल्या की, लेखा विभागाचा आढावा घेताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांना सांगितले पाहिजे. २५ ते ३० रजिस्टर असतात, विषय सूची दिसून येत नाही. सभापतींची वेळ घेऊन त्यांना हे सर्व रजिस्टर दाखविले पाहिजेत. सभापतींना विचारण्यात येत नाही. उप अभियंता यांनी प्रोसिडींग (कार्यवृत्त)लिहिले नाही. गत ३ वर्षात बांधकामाच्या प्रगतीची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात आलेली नाही. जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख वेळोवेळी पंचायत समितीला भेटी देत नसल्यामुळे अशा अडचणी निर्माण होत आहेत, त्यामुळे लेखा आक्षेप येतात.

पुढे समितीने निदेश दिले की, नियम ६७ अंतर्गत पंचायत समिती स्तरावर बांधकाम विभागाच्या व १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून होणारी बांधकामे यांचा तपशील ठेवला पाहिजे. नियम २३ प्रमाणे सर्व नोंदवह्या अद्ययावत ठेवल्या पाहिजेत. मागील तीन वर्षातील नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात आलेल्या नाहीत. यामध्ये उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे दोषी असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून त्यांची साक्ष घेण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**नोंदवह्या अद्ययावत न ठेवल्याबाबत (पंचायत समिती, देवळी) :-** नियम ६७ अंतर्गत पंचायत समिती स्तरावर बांधकाम विभागाच्या व १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून होणारी बांधकामे यांचा तपशील ठेवणे आवश्यक आहे, तसेच नियम २३ प्रमाणे सर्व नोंदवह्या अद्ययावत ठेवणे आवश्यक असतांना गत ३ वर्षातून नोंदवह्या अद्ययावत न ठेवल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार संबंधित उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

होय, चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती असे दिसून येते की, नियम २३ नसून नमुना २३ आहे. सदर नमुना सन २०१५-२०१६ पर्यंत अद्ययावत आहे. आक्षेपानुसार तीन वर्षातून अद्ययावत न ठेवल्याबाबत आक्षेप आहे. परंतु सन २०१६-२०१७ ची नोंद घेण्यात आली नव्हती व सन २०१७-१८ मध्ये पंचायत समिती सेस फंडातून कोणत्याही प्रकारची योजना प्रस्तावित केली नसल्यामुळे नोंद घेण्यात आली नव्हती. परंतु सद्य:स्थितीत सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ ची नोंद घेण्यात आली आहे. तसेच इतर सर्व नोंदवह्या अद्ययावतरित्या पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नोंदवह्या अद्ययावत करण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांना बांधकाम विभागाद्वारे पत्र क्र. जिपव/बांध/ऑडीट डिस्पो/वशि ६३१/१९, दिनांक २५/४/२०१९ अन्वये संबंधित कनिष्ठ अभियंता यांना ताकीद देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांनी श्री. पी. उ. सातपुते यांना त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. ४३६/१९, दिनांक ९/०५/२०१९ अन्वये सक्त ताकीद दिलेली आहे. तसेच नियमितपणे नोंदवह्या अद्ययावत ठेवण्याबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**१) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :–** अप्राप्त

**२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :–** (वित्त ३) जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, पंचायत समिती, देवळी सेस निधी नमुना २३ प्रमाणे सर्व नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात आल्या आहेत काय, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समितीचा सेसचा निधी नमुना २३ मध्ये खर्च झाला तर त्याची नोंद घ्यायची असते. परंतु, २०१५-२०१६, २०१६-२०१७ मध्ये खर्च झाला नव्हता, त्यामुळे ते लिहायचे राहिले होते. आता पंचायत समितीने (देवळी) ते अद्ययावत केले आहे. खर्च झाला नव्हता. शून्य खर्च होता. तो नंतर अद्ययावत करून घेतला आहे. त्यांनी प्रत्यक्षात निरंक असे नमूद करणे अपेक्षित होते. परंतु, पंचायत समिती (देवळी) ते अद्ययावत (अपडेट) केले नव्हते. ते आता अद्ययावत (अपडेट) करून घेतले आहे.

**अभिप्राय शिफारस**

पंचायती राज समितीद्वारे दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा, जिल्हा परिषदेचा दौरा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळेस दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी देवळी, पंचायत समितीस गटसमितीने भेट दिली असता, सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीच्या निदर्शनास आले की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ मधील नियम ६७ अन्वये नमुना २३ प्रमाणे बांधकाम/योजनांच्या प्रगतीची नोंदवहीसह अन्य महत्त्वाच्या पंचायत समितीच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात आलेल्या नाहीत. तसेच बांधकाम/योजनांच्या प्रगती नोंदवहीत गत तीन वर्षांच्या नोंदी घेतलेल्या नाहीत व उप अभियंता यांनी कार्यवृत्तही लिहिलेले नाही. यासंदर्भात गटविकास अधिकारी यांना समितीने विचारणा केली असता त्यांना याबाबत कोणतीही माहिती नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. पंचायत समितीच्या नोंदवह्यातील लेखा शीर्षाखाली प्राप्त झालेला निधी व खर्च झालेला निधी यांच्या अद्ययावत नोंदीसह सदरहू नोंदवह्या विषय समितीसमोर ठेवणे आवश्यक असताना, या महत्त्वाचे दस्तऐवज असलेल्या नोंदवह्यांची माहिती गटविकास अधिकारी यांना नसल्याने समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ मधील नियम ६ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे लेखे व वित्तीय अभिलेख याखाली विहित करण्यात आलेल्या नमुन्यात व नोंदणीपुस्तकाच्या स्वरूपात ठेवण्यात येतील. हे अभिलेख योग्य रीतीने व बरोबर ठेवले आहेत आणि ते अद्ययावत आहेत याबद्दल खात्री करून घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा यथास्थिती गटविकास अधिकारी यांची असेल. तसेच नियम ६७ अन्वये परिषद व समिती यांचा प्रत्येक विभागाध्यक्ष अनुक्रमे परिषदेशी व समितीशी संबंधित खर्चाच्या संबंधात नमुना २३ मध्ये बांधकाम/योजनांच्या प्रगतीची नोंदवही ठेवील. या नोंदवहीत निरनिराळ्या बांधकामांचा व योजनांचा संपूर्ण तपशील आणि त्यांचा प्रारंभ झाल्याच्या तारखेपासून त्यांच्या समाप्तीच्या तारखेपर्यंतच्या त्यांच्या वेळोवेळीच्या प्रगतीचा तपशील असेल. या नोंदवहीत नोंदी घेण्याचे काम अनुवर्ती महिन्याच्या १५ तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल. असे नियमानुसार काम करणे अपेक्षित असताना देवळी पंचायत समितीत निष्काळजी व बेजबाबदारपणे काम करण्यात आलेले असल्याने याबाबतची चौकशी करून संबंधित उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार, यासंदर्भात जिल्हा परिषद, वर्धा यांनी समितीस सादर केलेल्या माहितीत नमूद केले आहे की, सदर नमुना २३ प्रमाणे बांधकाम/योजनांच्या प्रगतीची नोंदवही सन २०१५-२०१६ पर्यंत अद्ययावत असून सद्य:स्थितीत सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ ची नोंद घेण्यात आली आहे. इतर सर्व नोंदवह्या अद्ययावतरित्या पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांनी कनिष्ठ अभियंता, श्री. पी. उ. सातपुते यांना सक्त ताकीद दिलेली आहे व नियमितपणे नोंदवह्या अद्ययावत ठेवण्याबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

समितीने देवळी पंचायत समितीस भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेत असताना पंचायत समितीच्या सर्व नोंदवह्या अद्ययावत करण्याबाबत तसेच बांधकाम/योजनांच्या प्रगतीच्या नोंदवहीत गत तीन वर्षांपासून नोंदी न घेतल्यासंदर्भात दोषी असलेल्या उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचे निदेश दिलेले असतानाही, सर्व नोंदवह्या अद्ययावतरित्या पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे व कनिष्ठ अभियंता यांच्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती समितीस सादर करण्यात आली आहे. **याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून पंचायत समितीच्या सर्व नोंदवह्या अद्ययावतरित्या पूर्ण करण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी, तसेच उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनाही सक्त ताकीद देण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

पंचायत समित्यांना त्यांच्या कामांमध्ये मार्गदर्शन करण्याकरिता पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडणाऱ्या विभागप्रमुखांनी नियमित भेटी देऊन मासिक सभांना उपस्थित राहिल्यास तालुक्यातील विकास कामांना गती येईल, त्याचबरोबर पंचायत समित्यांचे कामकाजही महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ मधील नमूद केलेल्या नियमानुसार होईल. तथापि, जिल्हा परिषदांचे खातेप्रमुख त्यांची जबाबदारी पार पाडत नसल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. **यासाठी जिल्हा परिषदांच्या विभागप्रमुखांनी पंचायत समित्यांना नियमित भेटी देऊन मासिक सभांना उपस्थित रहावे व पंचायत समितींचे दैनंदिन कामकाजानुसार नियमानुसार आवश्यक त्या सर्व नोंदवह्या ठेवण्यात आल्या आहेत काय, या नोंदवह्यांमध्ये नियमितपणे नोंद घेऊन अद्ययावत ठेवण्यात आल्या आहेत काय, सदरहू नोंदवह्या विषयसमितीसमोर ठेवण्यात आलेल्या आहेत काय याबाबतची तपासणी करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, वर्धा

## सहायक अध्यापक यांचेविरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत (पंचायत समिती, वर्धा)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, श्री. राजेंद्र डोळसकर यांनी श्री. वासुदेव डायगव्हाणे यांच्या संदर्भातील तक्रारअर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविला असून तो दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी त्यांना प्राप्त झाला आहे, त्या पत्राबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबत समितीस विदित केले की, श्री.वासुदेव डायगव्हाणे यांच्या तक्रारीसंदर्भातील पत्र मिळाले असून त्यासंदर्भातील चौकशी करून १ ते ४ जोडपत्र सादर करण्यात आले आहे. सदर अहवाल दिनांक ३ मे, २०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केलेला आहे. यावर समितीने निदेश दिले की, श्री. वासुदेव डायगव्हाणे यांच्यावर अनेक आरोप आहेत, शाळेतील संगणक ते घरी नेतात, त्यांच्या जागेवर शिकविण्यासाठी ते दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करतात. याबाबत सविस्तर तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यावर विभागाने समितीस अधिक माहिती दिली की, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांना ते धमकावितात, दररोज शाळेत ते उशिरा येतात. स्वतःच्या जागेवर दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करतात. त्यांनी १० लाख रुपयांची रक्कम शासनखाती जमा केलेली नाही. अशा प्रकारे त्यांच्यावर अनेक आरोप आहेत. समितीने विचारणा केली की, सदर तक्रार गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे कोणी केली होती व श्री. वासुदेव डायगव्हाणे यांच्या सेवापुस्तकात यासंदर्भातील नोंदी घेण्यात आल्या आहेत काय, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे काय, यावर विभागाने असे विदित केले की, दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी केंद्रप्रमुख यांनी तक्रार केली होती. १ ते ४ जोडपत्र सादर केल्यामुळे श्री.वासुदेव डायगव्हाणे यांचे वेतन (पेमेंट) थांबविणे आवश्यक होते. वेतन (पेमेंट) थांबविण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुखांची होती.

यावर समितीने विचारणा केली की, श्री.वासुदेव डायगव्हाणे या शिक्षकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात तक्रार करून दीड वर्षाचा कालावधी उलटला आहे. यावर समितीला विभागाने स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेकडे अहवाल सादर केलेला आहे. त्यावर समितीने निदेश दिले की, श्री. राजेंद्र डोळसकर यांनी श्री. वासुदेव डायगव्हाणे या शिक्षकावर गंभीर आरोप केले आहेत. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एका महिन्यांत चौकशी करून यासंदर्भातील स्वयंस्पष्ट अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती, वर्धा :-** श्री. वासुदेव डायगव्हाणे या शिक्षकावर अनेक आरोप आहेत, त्यामध्ये शाळेतील संगणक ते घरी नेतात, त्यांच्या जागेवर शिकविण्यासाठी दुसऱ्या शिक्षकाची नियुक्ती करतात, केंद्रप्रमुख व विस्तारअधिकारी यांना ते धमकावितात, दररोज शाळेत उशिरा येतात, स्वतःच्या जागेवर दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करतात, त्यांनी १० लाख रुपयांची रक्कम शासनखाती जमा केलेली नाही, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार संबंधित शिक्षकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

श्री. वासुदेव डायगव्हाणे, सहायक अध्यापक, पंचायत समिती, वर्धा यांचे विरूद्ध असलेल्या तक्रारीनुसार प्राथमिक चौकशी आदेशित करण्यात आली होती. त्यास अनुसरून गटशिक्षणाधिकारी, पं.स., वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र. पसव/गशिअ/विअ/वशि-८४२/१८, दिनांक १३/०८/२०१८ अन्वये चौकशी अहवाल संपूर्ण दस्तऐवजासह शिक्षण विभागास सादर केल्यानंतर श्री. डायगव्हाणे यांचेवर विभागीय चौकशी निश्चित करण्याचे अनुषंगाने या कार्यालयाचे ज्ञापन क्र. जिपव/प्राशिवि/विचौ/वशि-१९/२०१९, दिनांक २९/०१/२०१९ नुसार आरोपपत्र १ ते ४ बजावण्यात आले आहे. सदर ज्ञापनाचे स्पष्टीकरण श्री. डायगव्हाणे यांनी दिनांक ०७/०२/२०१९ ला सादर केले असून त्यांचेवर ठेवण्यात आलेले १ ते १३ दोषारोप अमान्य केले आहेत. अमान्य केलेल्या दोषारोपांसंबंधाने त्यांच्यावर जबर शिक्षेच्या प्रयोजनार्थ विभागीय चौकशी करण्यात येत आहे. सदर प्रकरणी जाणीवपूर्वक कुठलाही विलंब करण्यात आलेला नाही. त्यामुळे कृपया सदर परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**(१) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** श्री. वासुदेव डायगव्हाणे हे जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत शिक्षकांच्या विरुद्ध कार्यवाही करण्याची बाब संबंधित जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील बाब आहे. सबब याप्रकरणी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अभिप्राय निरंक आहेत.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, श्री.वासुदेव डायगव्हाणे या शिक्षकावर अनेक आरोप असून त्यामध्ये ते शाळेतून संगणक घरी नेतात, त्यांच्या जागेवर शिकवण्यासाठी दुसऱ्या शिक्षकाची नियुक्ती करतात. सदरहू प्रकरणी विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे काय, यावर अपर मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, सदरहू प्रकरणाची कारवाई जिल्हा परिषद स्तरावरून करण्यात येते तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विदित केले की, सदर प्रकरणाची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ०८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा, जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, श्री.वासुदेव डायगव्हाणे, सहायक अध्यापक यांच्याविरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्यावर अनेक आरोप आहेत त्यामध्ये शाळेत उशिराने उपस्थित रहाणे, शाळेतील संगणक घरी नेणे, त्यांच्या जागेवर शिकविण्यासाठी दुसऱ्या शिक्षकाची नियुक्ती करणे, केंद्रप्रमुख व विस्तारअधिकारी यांना धमकाविणे तसेच रुपये १० लाख इतकी रक्कम शासन खाती जमा न करणे, श्री.डायगव्हाणे यांची तक्रार दिनांक २३/३/२०१७ रोजी केंद्रप्रमुख यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे केली असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेही दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला अहवाल व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, श्री. वासुदेव डायगव्हाणे, सहाय्यक अध्यापक यांच्याविरुद्ध असलेल्या तक्रारीनुसार प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे व त्यानुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वर्धा यांनी संपूर्ण दस्तऐवजासह चौकशी अहवाल शिक्षण विभागास सादर केला आहे. त्याअनुषंगाने श्री. डायगव्हाणे यांच्यावर जबर शिक्षेच्या प्रयोजनार्थ विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

श्री. वासुदेव डायगव्हाणे, सहायक अध्यापक यांच्या गैरप्रकाराबाबत कारवाई होण्याच्या दृष्टीने केंद्रप्रमुख यांनी दिनांक २३/०३/२०१७ रोजी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असतानाही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कारवाई गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली नाही. समितीने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये पंचायत समिती, वर्धा येथे भेट दिली असता त्याचवेळेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला अर्ज व त्याअनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीवरून समितीने चौकशी करून कारवाई करण्याचे निदेश दिल्यानंतर त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. **गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे माहे मार्च, २०१७ मध्ये तक्रार केली असतानाही त्यांनी कारवाई का केली नाही याबाबतचे स्पष्टीकरण त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच श्री. डायगव्हाणे यांची करण्यात येत असलेली विभागीय चौकशी तात्काळ पूर्ण करून निष्कर्षाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्या जागेवर शिकविण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास तसेच इतरही आरोपासंदर्भात समितीच्या भेटीच्या वेळी सांगण्यात आले होते. या प्रकरणी चौकशी समितीही गठीत करण्यात आल्याची माहिती समितीला सांगण्यात आली होती. असे असूनसुद्धा या प्रकरणी आरोपित शिक्षकाची चौकशी अद्याप न होणे ही बाब गंभीर आहे. याप्रकरणी चौकशी अधिकारी दिरंगाई करीत आहेत किंवा कसे, तसेच कायद्याद्वारे त्यांच्यावर निश्चित केलेले कर्तव्य पार पाडण्यास चौकशी अधिकारी कमी पडले किंवा कसे याचीही चौकशी होऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. त्याचप्रमाणे प्रलंबित असलेली संबंधित शिक्षकाची चौकशी तातडीने पूर्ण करून कारवाईसह चौकशी अहवाल समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, वर्धा

### १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविल्याबाबत (पंचायत समिती, वर्धा)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, या तालुक्यात १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून किती पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत, यावर गटविकास अधिकारी (वर्धा) यांनी खुलासा केला की, ३६ ग्रामपंचायतींमध्ये मीटर बसविण्यात आले आहेत. त्यावर १ कोटी ६७ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणचे मीटर काढण्यात आले असून काही मीटरची तोडफोड करण्यात आली आहे. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, मीटर बसविण्याची मागणी होती काय, उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत काय, पूर्ण जिल्ह्यात जीटी पाईपची मागणी केली होती ते पुरविण्यात आले आहेत काय, विभागाकडून समितीस उत्तर देण्यात आले की, जीटी पाईपला स्केलिंग होते त्यामुळे युपीव्हीएस पाईप वापरण्यात आलेला आहे. वर्धा तालुक्यात १०३० मीटर बसविण्यात आले आहेत.समितीने विचारणा केली की, १०३० मीटरचे बिल इश्यू केले आहे काय, याबाबत विभागाकडून उत्तर देण्यात आले की, १०३० मीटर लावण्यात आले असून १ एप्रिलपासून कार्यान्वित केले आहेत. १००० लीटरसाठी ८ ते १० रुपये पाण्याचा दर पडतो. काही लोकांनी मीटर काढले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, १४ व्या वित्त आयोगातून मीटर बसविण्यास परवानगी आहे काय, या निधीतून पाईपलाईन दुरुस्ती करता येते, पाईपलाईन टाकता येते. पाईपलाईन दुरुस्तीची मागणी होती काय , १४ व्या वित्त आयोगाच्या निकषात याबाबी बसतात काय, सदर योजनेवर निधी खर्च केलेला आहे. देवळी व वर्धा या तालुक्यात १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे श्री.राजेंद्र डोळसकर यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यात चौकशी करावी व याबाबत थर्डपार्टी ऑडीट करून यासंदर्भातील स्वयंस्पष्ट अहवाल १ महिन्यात समितीला सादर करण्याबाबत सूचना दिली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**१४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविण्याबाबत (पंचायत समिती, वर्धा) :-** देवळी व वर्धा या तालुक्यात १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. याप्रकरणी श्री. राजेंद्र डोळसकर यांनी केलेल्या आरोपासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली तसेच यासंदर्भात त्रयस्थ पक्ष लेखापरिक्षण करण्यात आले आहे काय, त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समितीने श्री. राजेंद्र डोळसकर, सदस्य, पंचायत समिती, वर्धा यांचे तक्रारीचे अनुषंगाने देवळी व वर्धा तालुक्यात १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविताना जी.आय.पाईप न वापरता यू.पी.व्ही.सी.पाईप वापरण्याबाबत आक्षेप घेऊन त्रयस्थ यंत्रणेचा अभिप्राय मागविण्याबाबत केलेल्या सूचनेन्वये व्हि.एन.आय.टी., नागपूर या संस्थेच्या स्थापत्य विभागाकडून तांत्रिक अभिप्राय मागविण्यात आला आहे. त्यामध्ये व्हि.एन.आय.टी., नागपूर यांनीसुद्धा जी.आय.पाईप ब्लिचींग पावडरमुळे सडतात/खराब होतात व त्याऐवजी PVC,UPVC,CPVC व HDPE पाईप जास्त योग्य असून ते वापराबाबत सूचना केल्या आहेत. तसेच व्हि.एन.आय.टी., नागपूर यांनी CPHEEO Manual (पिण्याच्या पाण्याचे Red Book) मध्ये जी.आय.पाईप लवकर खराब होणेबाबत उल्लेख असल्याचे नमुद केले आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता ग्रामपंचायतीने वैयक्तिक नळजोडणी (मीटर बसविणे) करीता वापरलेले यु.पी.व्ही.सी. पाईप योग्य व कमी खर्चाचे असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे श्री. राजेंद्र डोळसकर, सदस्य, पंचायत समिती, वर्धा यांनी केलेली तक्रार तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याचे या विभागाचे मत आहे. सदर अहवालाची प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत असून, हा मुद्दा वगळण्यात यावा ही विनंती.

### मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**१) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वर्धा यांनी दिलेल्या माहितीशी विभाग सहमत आहे.

**२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वर्धा यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, देवळी व वर्धा या तालुक्यात १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत, याप्रकरणी श्री. राजेंद्र डोळसकर यांनी केलेल्या आरोपांसदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली तसेच यासंदर्भात त्रयस्थ पक्ष लेखापरीक्षण करण्यात आले आहे काय, त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल समितीला सादर करण्यात यावा. यावर अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी खुलासा केली की, वर्धा जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्वतःच्या निधीतून मीटर बसविले होते. मीटरला जोडणी करण्यासाठी जी अर्धा किंवा पाऊण इंच मापाची पाईपलाईन करण्यात आली ती लोखंडी म्हणजे जी.आय. पाईपची न करता प्लास्टिक पाईपची करण्यात आली. त्यामुळे एका इसमाने याबाबत तक्रार केली आहे. त्याबाबत चौकशी करण्यात आली. परंतु आजही प्लास्टिकचे पाईप्स् वापरतो. कारण लोखंडी पाईप गंज पकडतात. बऱ्याच वर्षांपासून आपण प्लास्टिक पाईप्स वापरतो. वर्धा जिल्ह्यामध्ये युपीबीसी पाईप्स वापरण्यात आले. हे पीव्हीसीपेक्षा सुधारित प्लास्टिक आहे. आता एचडीबी प्रकारचे पाईप्स वापरतो. काळानुरुप नवनवीन मटेरियल येत आहे. तेव्हा देखील चांगले पाईप वापरण्यात आले आहेत. त्याबाबतही कोणाची तक्रार नाही. तक्रारकर्त्याचे कदाचित असे म्हणणे होते की, यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु चौकशी केली असता भ्रष्टाचार झाल्याचे दिसत नाही. याबाबत अधिकची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केली की, सदर मीटर्सच्या दर्जाची तपासणी करण्याचे काम आपण व्हीएनआयटी, नागपूर यांच्याकडे दिले होते. त्याचबरोबर आम्ही सीएकडून देखील ऑडिट करून घेतले. दोन्ही रिपोर्टनुसार काहीही चूक आढळून आली नाही. पिण्याच्या पाण्याच्या रेडबुकमधील गाईडलाईन्सनुसार पीव्हीसी पाईपचा वापर करता येतो, असा अहवाल व्हीएनआयटी यांनी सादर केला आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदर पाईपलाईनची सध्याची अवस्था कशी आहे, मीटर्स सुरू आहेत का, मीटर्स बंद पडले किंवा लोकांनी काढून नेले असे झाले आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सध्या पाईपलाईन सुरू आहे. मीटर्स सुरू आहेत फक्त ग्रामपंचायत मीटरप्रमाणे आकारणी करीत नाही. याबाबत समितीने सहमती दर्शविली.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षीक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीस निदर्शनास आले की, वर्धा तालुक्यात ३६ ग्रामपंचायतींमध्ये १ कोटी ६७ लाख इतकी रक्कम खर्च करून एकूण १०३० इतके पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. या अनुषंगाने देवळी व वर्धा या तालुक्यांमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून बसविण्यात आलेल्या पाण्याचे मीटर व जी.आय.पाईप न वापरता यू.पी.व्ही.सी. पाईप वापरण्यात आल्याबाबत पंचायत समिती सदस्य यांच्याकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषद यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल व या विषयासंदर्भात घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, देवळी व वर्धा तालुक्यात १४ व्या वित्त आयोगातून पाण्याचे मीटर बसविताना यू.पी.व्ही.सी. पाईप वापरण्यात आल्याबाबत पंचायत समिती सदस्य यांनी आक्षेप घेऊन केलेल्या सूचनेन्वये व्हि.एन.आय.टी., नागपूर या संस्थेकडून अभिप्राय मागविण्यात आला आहे. या संस्थेने नमूद केले आहे की, जी. आय. पाईप ब्लिचींग पावडरमुळे सडतात/खराब होतात. यू.पी.व्ही.सी. पाईप योग्य व कमी खर्चाचे असतात. तसेच सनदी लेखापाल यांच्याकडून लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. या दोन्ही अहवालानुसार या प्रकारणात कोणताही गैरव्यवहार झालेला नसून प्राप्त तक्रार तांत्रिकदृष्टया योग्य नाही. या प्रकरणाची चौकशी करून सादर करण्यात आलेल्या अहवालाबाबत समिती समाधान व्यक्त करत आहे.

तथापि, समितीच्या असेही निदर्शनास आले की, १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधील १ कोटी ६७ लाख इतक्या मोठ्या प्रमाणात निधी ग्रामपंचायतींमध्ये पाण्याचे मीटर बसविण्याकरिता खर्च केलेला असताना अनेक ठिकाणचे मीटर काढण्यात आले असून काही मीटरची तोडफोड करण्यात आलेली आहे. तसेच काही ठिकाणी मीटर्स सुरू असतानाही ग्रामपंचायतीमार्फत मीटरप्रमाणे आकारणी करण्यात येत नाही. सदरहू बाब निश्चितच गंभीर स्वरूपाची असून केलेल्या कामाची फलनिष्पत्ती झालेली नसल्याने या कामावर मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या खर्चाचा अपव्यय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**यास्तव, पाण्याचे मीटर बसविण्यात आलेल्या ग्रामपंचायतींपैकी किती ग्रामपंचायतींनी मीटर बसविण्याची मागणी केली होती, १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पाण्याचे मीटर बसविण्याची परवानगी घेण्यात आली होती काय याची चौकशी करावी व यामध्ये दोषी आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच यापुढे बसविण्यात आलेल्या मीटर्सची देखभाल व दुरुस्ती करण्यासह ग्रामपंचायतींकडून मीटरप्रमाणे आकारणी करण्याबाबत जिल्हा परिषदेने याचे ग्रामपंचायतीद्वारा सनियंत्रण केले किंवा कसे, त्याचप्रमाणे या योजनेत असलेल्या त्रुटी दूर करून त्याचे निर्वाहन केले किंवा कसे याबाबतचा सविस्तर अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, वर्धा

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (पंचायत समिती, आर्वी)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने गटविकास अधिकारी (आर्वी) यांना अशी विचारणा केली की, १६८ शाळांमधील १४ हजार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली आहे काय, शिल्लक राहिलेल्या ४२६ विद्यार्थ्यांची तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेऊन केली आहे. त्यामुळे १०० टक्के आरोग्य तपासणी झालेली आहे. आपण खरोखरच मुलांची आरोग्य तपासणी केली आहे का, की कागदावरच तपासणी झालेली आहे, आपण केलेल्या तपासणीत फक्त २२ विद्यार्थ्यांना आजार असल्याचा उल्लेख केलेला आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी स्पष्ट केले की, आर्वी तालुक्यात डॉक्टरांच्या दोन टीम तयार केल्या होत्या. समितीने विचारणा केली की, ही तपासणी किती इयत्तापर्यंत केली आहे, गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पहिली ते बारावी पर्यंत तपासणी केलेली आहे. तसेच ३३ खाजगी शाळा आणि जिल्हा परिषदेच्या १४३ शाळा, नगरपरिषदेच्या ९ शाळा, सोशल वेलफेअरची १ शाळा यांची तपासणी केली होती. यावर समितीने विचारणा केली की, एकूण विद्यार्थी संख्या किती आहे, गट शिक्षणाधिकारी यांनी स्पष्ट केले की, पहिली ते बारावी पर्यंतची २३९८६ विद्यार्थी ही विद्यार्थी संख्या आहे. समितीने विचारणा केली की, सन २०१४-२०१५ मध्ये विद्यार्थी संख्या १४ हजार होती आणि सन २०१८ मध्ये ही संख्या १९ हजाराच्या आसपास गेली. एवढे विद्यार्थी वाढले आहेत का यावर गट शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, १४ हजार विद्यार्थी हे ग्रामीण भागातील अनुदानित शाळांमधील होते. विभागाने समितीस अधिकची माहिती दिली की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ही संख्या आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत (आरबीएसके) टीम विद्यार्थ्यांची तपासणी करते. विद्यार्थ्यांची जेव्हा तपासणी करण्यात आली त्यामध्ये ४ रुग्ण हृदयरोगाचे (हार्टचे) आढळून आले होते. त्या चारही मुलांवर शस्त्रक्रिया (सर्जरी) झालेली आहे. तपासणीमध्ये २६ विद्यार्थ्यांमध्ये दोष आढळून आला होता. यावर समितीने विचारणा केली की, आपण चौदा हजार विद्यार्थ्यांची तपासणी केली त्यामध्ये फक्त २६ विद्यार्थी आजारी निघालेत का, यावर विभागाकडून उत्तर दिले की, त्या व्यतिरिक्त ४६९ विद्यार्थी किरकोळ आजाराचे आहेत. समितीने विचारणा केली की, सन २०१३-२०१४ मध्ये १४ हजार विद्यार्थी होते आणि सन २०१७-२०१८ मध्ये २३ हजार विद्यार्थी आहेत. आपण नेमकी किती विद्यार्थ्यांची तपासणी केलेली आहे? विभागाने समितीस उत्तर दिले की, सन २०१३-२०१४ मध्ये १३५८७ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली आहे. समितीने विचारणा केली की, सन २०१७-२०१८ मध्ये किती विद्यार्थी होते आणि किती विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली? यासंदर्भात विभागाकडून समितीस उत्तर देण्यात आले की, १३५८७ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली आहे. समितीने विचारणा केली की, सन २०१४-२०१५ मध्ये ४२६ विद्यार्थी राहिलेले आहेत. त्यांचा अहवाल तुमच्याकडे आलेला आहे का? विभागाकडून उत्तर देण्यात आले की, यामध्ये गंभीर आजाराचे विद्यार्थी सापडले नाहीत.

समितीने विचारणा केली की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत नगरपरिषदेच्या शाळा तपासतात आणि शहरातील शाळा तपासत नाहीत. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य (आरबीएसके) कार्यक्रमांतर्गत जे डॉक्टर्स काम करतात त्यांना किती पगार मिळतो, विभागाकडून विदित करण्यात आले की, या डॉक्टरांना दरमहा २० हजार रुपये पगार मिळतो. समितीने निदेश दिले की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य (आरबीएसके) कार्यक्रमांतर्गत जे डॉक्टर्समंडळी काम करतात त्यांना २० हजार रुपये दरमहा पगार दिला जातो. हा पगार अतिशय कमी आहे. हे बी.ए.एम. एस. झालेले डॉक्टर्स असले तरी त्यांना पगार वाढवून देण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (पंचायत समिती, आर्वी) :–**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत काम करणारे डॉक्टर्स दरमहा केवळ रुपये वीस हजार एवढे कमी वेतन दिले जात असल्याप्रकरणी शासनाने सदर वेतनामध्ये वाढ करण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्र. जाक्र. राआसोम/राकाव्य/मार्गदर्शक सूचना १८-१९/७९४०९-५१३/१८, दि. ६-१० डिसेंबर २०१८ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत काम करणारे डॉक्टर्स यांना रुपये पंधरा हजार प्रतिमाह मानधन देण्यात येते, तसेच त्यांच्या पुनर्मुल्यांकन अहवालानुसार पुनर्नियुक्ती नंतर त्यांना ५ टक्के मानधन वाढ देण्यात येते. पंचायती राज समिती यांनी दि.८ ते १० ऑगस्ट, २०१८ च्या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यास अनुसरून मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** विभागाशी संबंधित नाही.

**(२) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्रायः-** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) ही केंद्र शासनाची योजना आहे. या अंतर्गत काम करणारे डॉक्टर्स हे मानधनावर नियुक्त केलेले असून त्यांना वेतन अनुज्ञेय नाही. सदर डॉक्टरांना नियुक्तीच्या वेळी रुपये १५,००० मानधन आणि ५ टक्के वार्षिक मानधन वाढ कार्यमुल्यांकन अहवालानुसार देण्यात येत होती. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार विविध पदांचे व मानधनाचे सूसुत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये २८,००० प्रती महिना मानधन देण्यात येणार आहे. तसेच त्यांना त्यांच्या कार्यमूल्यांकन अहवालानुसार मानधनात ५ % वार्षिक वाढ अनुज्ञेय आहे.

कार्यरत सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार ३ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या उमेदवारांना मानधनामध्ये अतिरिक्त १० टक्के वाढ, तसेच ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या उमेदवारांना अतिरिक्त १५ टक्के अशी एक वेळची मानधन वाढ ५ टक्के वार्षिक मानधन वाढी व्यतिरिक्त अनुज्ञेय केली आहे. यामध्ये उपरोक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे काय?

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा सादर केला की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या मानधनाच्या संदर्भातील सदरहू मुद्दा आहे. सदरहू वैद्यकीय अधिकारी यांना २० हजार रुपये मानधन देण्यात येते, त्यामध्ये वाढ केली पाहिजे अशी समितीची शिफारस होती. माहे मेमध्ये समितीस माहिती सादर केली होती. त्यावेळी उक्त योजनेंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना १५ हजार रुपये मानधन देण्यात येत होते. दरम्यानच्या कालावधीत उक्त मानधन रकमेमध्ये केंद्र शासनाने वाढ केलेली असून दरमहा २८ हजार रुपये मानधन देण्यात येत आहे. यासंदर्भात परिपत्रक निर्गमित केले आहे व समितीस सुधारित माहिती सादर करण्यात आली आहे. नवीन नियुक्ती होणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांना २८ हजार रुपये मानधन मिळेल व जुन्या कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर १० टक्के व ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी काम केल्यास १५ टक्के वाढ देण्यात येईल. अशा पद्धतीने वैद्यकीय अधिकारी यांना द्यावयाच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे. पूर्वी वैद्यकीय अधिकारी यांना १५ हजार रुपये मानधन देण्यात येत होते. सदरहू वैद्यकीय अधिकारी यांच्या भरवशावर ग्रामीण आरोग्य सेवा आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा विषय वेगळा आहे.

उक्त कार्यक्रमांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अखत्यारीत काम करतात. एक महिला व पुरुष डॉक्टरांचे पथक शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करते. शल्य चिकित्सक हे ग्रामीण रुग्णालयातील एखाद्या ठिकाणी डॉक्टर नसेल तर तेथे काम करण्यासाठी उक्त कार्यक्रमांतर्गत कार्यरत डॉक्टर यांना आदेश देतात. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत डॉक्टरांच्या भरवशावर जिल्ह्यातील १४ आरोग्यकेंद्र सुरू आहेत. कारण त्या ठिकाणी डॉक्टर नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासंदर्भातील सद्यःस्थिती काय आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीला विदित केले की, सदरहू डॉक्टरांची ८७७ पदे भरण्याकरिता माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये जाहिरात काढण्यात आली होती व ३ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. मध्यंतरी आरक्षणासंदर्भातील याचिका माननीय उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली होती त्यासंदर्भात आता निकाल देण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारित बिंदूनामावली प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने उक्त पदे भरण्यासाठी आज व पुढील ३ दिवस आरोग्य भवन येथे काऊन्सिलींग सुरू आहे. ज्या दिवशी काऊन्सिलींग होते त्या दिवशी सदरहू डॉक्टर यांना नियुक्तीपत्र देण्यात येत आहे. पुढील १० ते १५ दिवसांच्या कालावधीमध्ये सर्व डॉक्टर रुजू होतील अशी आशा आहे. पुढे समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांची पदे भरण्यात येतील काय, कोणत्या विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी यांची पदे अधिक प्रमाणात रिक्त आहेत, विदर्भामध्ये अधिक पदे रिक्त आहेत काय यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, रिक्त पदांच्या भरतीसंदर्भात आजपासून पुढील ३ दिवसांपर्यंत आरोग्य भवन येथे काऊन्सिलींग सुरू राहणार. सदरहू पदांसाठी ३ हजार अर्ज प्राप्त झाले असून ३ दिवसांमध्ये काऊन्सिलींग पूर्ण झाले नाही तर प्रक्रिया सुरू ठेवण्यात येईल. रत्नागिरी जिल्ह्यात अधिक पदे रिक्त असून नंदुरबार व चंद्रपूर जिल्ह्यात ४० टक्के पदे रिक्त आहेत. नंदूरबार येथे अधिक प्रमाणात पदे रिक्त आहेत.

समितीने विचारणा केली की, अमरावती, वर्धा, भंडारा येथे वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त आहेत काय, तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत डॉक्टरांची पदे तात्पुरती आहेत. आता जी पदे भरण्यासाठी काऊन्सिलींग करण्यात येत आहे त्या डॉक्टरांना दरमहा किती

वेतन देण्यात येणार आहे यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस स्पष्ट केले की, उक्त पदे प्राथमिकतेने भरण्यात येतील. सदरहू पदासाठी नियमानुसार व स्केलप्रमाणे ६० हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन देण्यात येईल. समितीने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना विचारणा केली की, आपल्या विभागात तज्ञ डॉक्टरांना १ ते २ लाख रुपयांपर्यंत वेतन देऊन सेवेत आणण्याच्या प्रस्तावाचे काय झाले, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, राष्ट्रीय आरोग्य अभियानचा ( एनएचएम) प्रस्ताव आहे. विशेषज्ञ पदांसाठी २ ते ३ प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे. डिप्लोमाधारकांना ३ आगाऊ वार्षिक वेतनवाढ व पदव्युत्तर पदवीधारकांना ६ आगाऊ वेतनवाढ देण्यात येते. राष्ट्रीय आरोग्य अभियानमार्फत (एनएचएम) पद भरती करण्यात येते. त्यासंदर्भात २ ते ३ योजना आहेत. ॲनेस्थेटिस्ट, गायनॅकॉलॉजिस्ट, पेडीट्रीशन उपलब्ध होत नसल्याने प्रकरण परत्वे बाहेरील डॉक्टरांची सेवा घेता येऊ शकते. सिझरींग करण्यासाठी डॉक्टर उपलब्ध नसतील तर ४ हजार रुपये ती केस हाताळण्यासाठी खाजगी डॉक्टरांना देता येऊ शकतात. कोस्टल भागासाठी केंद्र शासनाची वेगळी योजना आहे. आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञांना राष्ट्रीय आरोग्य अभियानमार्फत (एनएचएम) नियुक्त करण्यात येते. त्यांना ७५ हजार, १ लाख ते १.२५ लाख रुपये वेतन देण्यात येते. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथील पदासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली आहे. तेथे काम करणाऱ्या डॉक्टर जोडप्यास २.५ लाख रुपये वेतन देण्यात येते. समितीने विचारणा केली की, स्पेशालिस्ट डॉक्टर यांना अधिक वेतन दिले नाही तर शासकीय रुग्णालयामध्ये काम करण्यास तयार होणार नाहीत. एमबीबीएस पदवीधर डॉक्टर ग्रामीण भागामध्ये काम करण्यास इच्छुक नाहीत. त्यांनी केलेले कॉन्ट्रॅक्ट ते पूर्ण करीत नसून त्यासाठी दंड भरण्याची त्यांची तयारी असते परंतु शासकीय रुग्णालयास सेवा देण्याची तयारी नसते. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विशद केले की, मागील अनेक वर्षांपासून दोन प्रकारचे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात येत आहेत. त्यासंदर्भात निर्णय झाल्यास प्रश्न सुटेल. समितीने मत व्यक्त केले की, अमरावती जिल्ह्यामध्ये मागील १० ते १२ वर्षांपासून वैद्यकीय अधिक्षक यांची पदे भरण्यात आलेली नाहीत. जिल्ह्यात ३ महामार्ग आहेत. या महामार्गावरील पोलिसांना रोज प्रेत उचलणे, पोस्टमार्टेम करून घेणे व पंचानामे करणे, प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देणे, एवढेच काम आहे. ट्रॉमा केअरची ३ कोटी रुपयांची इमारत बांधून तयार आहे. तेथे कर्मचारी (स्टाफ) व स्पेशालिस्ट यांची नियुक्ती करण्यात आली नाही. शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून सुसज्ज ट्रॉमा केअर इमारती उभ्या केल्या आहेत. परंतु तेथे डॉक्टर, कर्मचारी (स्टाफ) व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, ट्रॉमा केअर युनिटच्या संदर्भात विधिमंडळाच्या सभागृहामध्ये घोषणा केली होती व एक समिती स्थापन करण्यात आली आहे. यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. ट्रॉमा केअर युनिट येथे सध्याच्या योजनेनुसार युनिट होऊ शकत नाही. कारण तेथे केवळ एकच ॲडिशनल ॲनेस्थेटीस्ट मिळत आहे व काही ठरावीक साहित्य मिळत आहे. केंद्र शासनाच्या कन्सेप्टमध्ये एवढे अधिक ट्रॉमा केअर युनिट अपेक्षित नव्हते. ५० ते ६० कि.मी. अंतरावर ट्रॉमा केअर युनिट बांधण्यात आले आहेत. सदरहू युनिट ३०० व त्यानंतर ६०० कि.मी. अंतरावर युनिट उभारावे, असे केंद्र शासनाचे म्हणणे आहे. त्या ठिकाणी न्युरोसर्जरीपासून सर्व प्रकारची सुविधा उपलब्ध करून देता आली पाहिजे. अशा पद्धतीच्या सुविधा अद्याप नाहीत. यास ट्रॉमा केअर युनिट म्हणावे किंवा नाही, असा प्रश्न आहे. यास विभागाने अनेक वेळा विरोध केला आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभागाचा विरोध असला तरी ट्रॉमा केअर युनिट विभागाने जाहीर केले आहे. ट्रॉमा केअर युनिटच्या इमारतीचे काय करणार, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विशद केले की, सदरहू प्रकरणी समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री महोदयांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत श्रेणी वर्धनाच्या प्रस्तावास १० ते १५ वर्षांपासून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी अनेक प्रकरणे असून त्या कामांसाठी सुमारे २.५ ते ३ हजार कोटी रुपयांपर्यंतच्या निधीची आवश्यकता आहे. विभागाला २५० कोटी रुपये इतका निधी दरवर्षी प्राप्त होतो. मुख्यमंत्री महोदय व मंत्री महोदयांनी श्रेणीवर्धन प्रस्ताव मान्य करू नयेत अथवा निधी वाढवून देण्यात यावा, अशा विनंतीचा प्रस्ताव विभागाने सादर केला आहे. अनेक लोकप्रतिनिधी श्रेणीवाढीची मागणी करतात ती रास्त आहे. महामार्गावर अनेक वेळा अपघात होत असतात त्यामुळे तेथे ट्रॉमा केअर युनिट असणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु त्यासाठी विभागाला निधीची तरतूद उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

समितीने निदेश दिले की, डॉक्टरांची रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीस गटविकास अधिकारी यांनी निदर्शनास आले की, सन २०१४-२०१५ या वर्षात आर्वी तालुक्यात ३३ खाजगी शाळा, जिल्हा परिषदेच्या १४३ शाळा, नगरपरिषदेच्या ९ शाळा व सोशल वेलफेअरची १ शाळांमधील पहिली ते बारावी पर्यंतच्या एकूण १४ हजार विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. १०० टक्के वैद्यकीय तपासणीत २६ विद्यार्थ्यांना गंभीर स्वरूपाचे आजार व ४६९ विद्यार्थ्यांना किरकोळ स्वरूपाचे आजार असल्याचे निष्पन्न झाले. यातील हृदयविकार या गंभीर आजाराचे ४ रुग्ण आढळून आले त्यांच्यावर सर्जरी करण्यात आली आहे. **या तालुक्यातील १०० टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्याबाबत या कामातील सर्व संबंधितांचे समिती अभिनंदन करीत आहे. तसेच गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्यांना नियमित संदर्भसेवा मिळण्यासाठी जिल्हा**

**परिषद आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) व तालुकास्तरावरील संबंधित अधिकारी यांनी समन्वय ठेवून योग्य ती कार्यवाही करावी, असे समितीला अपेक्षित आहे.**

या चर्चेदरम्यान राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कमी वेतनावर काम करावे लागत असल्याने त्यांच्या वेतनात वाढ करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी असे निदेश समितीने दिले. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीवरून समितीस माहिती मिळाली की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत काम करणारे डॉक्टर्स यांना रुपये पंधरा हजार प्रति माह मानधन देण्यात येते व पुर्ननियुक्ती नंतर त्यांना ५ टक्के मानधन वाढ देण्यात येते. समितीने वेतनवाढ संदर्भात दिलेल्या निदेशानुसार सदरहू प्रकरण प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. त्यानुसार या प्रकरणाबाबत लावण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, या योजनेंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना मानधन देण्यात येते. या मानधनामध्ये केंद्र शासनाने वाढ केली असून त्यानुसार दरमहा २८ हजार रुपये मानधन व ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर १० टक्के व ५ वर्षांपेक्षा अधिक कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर १५ टक्के वाढ देण्यात येईल. याबाबतचे परिपत्रक विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ झाल्याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवासंदर्भात चर्चा करत असताना समितीने असे निदर्शनास आणले की, राज्यातील प्राथमिक आरोग्य व ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना या रूग्णालयात काम करण्याबाबत आदेशित केले जाते. तसेच राज्यातील महामार्गावर कोट्यवधी रुपये खर्चून ट्रामा केअर युनिटच्या इमारती बांधुन तयार आहेत. परंतु येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अन्य कर्मचारी व आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने सदरहू ट्रामा केअर युनिट सुरू करण्यात आलेले नाहीत. या संदर्भात सचिवांनी समितीस माहिती दिली की, ट्रामा केअर युनिटच्या संदर्भात समिती स्थापन करण्यात आलेली आहे तसेच ग्रामीण भागातील रुग्णालयातील एकूण ८७७ पदे भरण्याकरिता जाहिरात देऊन कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाला दरवर्षी २५० कोटी इतका निधी प्राप्त होत असून अनेक कामांसाठी सुमारे २.५ ते ३ हजार कोटीपर्यंतच्या निधीची आवश्यकता आहे त्यानुसार निधी वाढवून देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होत असताना तेथील जनतेला आवश्यक त्या वैद्यकीय सोयी सुविधा उत्कृष्ट दर्जाच्या मिळण्यासाठी तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय सुस्थितीस असण्यासह आवश्यक यंत्रसामग्री व तज्ञ वैद्यकीय अधिकारी असणे आवश्यक आहे. यासाठीच रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनासाठी लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात येते. तसेच राज्यातील महामार्गांवर वाहनांच्या अपघाताचे प्रमाण वाढले असून यामध्ये जीवित हानी होऊ नये यासाठी अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी ट्रामा केअर युनिट उभारण्यात आलेले आहे. तथापि, या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अन्य कर्मचारी उपलब्ध करून न दिल्यामुळे सदरहू युनिट कार्यान्वित करण्यात आलेली नाहीत.

**यास्तव, ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत सुरू करण्यात आलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करून या वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांची सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच ग्रामीण रुग्णालयांचे श्रेणीवर्धन संदर्भातील शासनाकडे प्राप्त प्रस्तावांवर नियमान्वये कार्यवाही करून रुग्णालयांची श्रेणीवाढ करण्यात यावी. त्याचप्रमाणे ट्रामा केअर युनिटच्या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या समितीने धोरणात्मक निर्णय घेऊन सदरहू रुग्णालयांना आवश्यक त्या सोयी सुविधांसह वैद्यकीय अधिकारी व अन्य कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी. राज्यातील वैद्यकीय सेवेतील आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागास देण्यात येत असलेल्या निधीत वाढ करण्यासंदर्भात शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर सकारात्मक निर्णय घ्यावा व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, वर्धा

## उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत इयत्ता ८ वी चा वर्ग सुरू केल्याबाबत

## (पंचायत समिती, कारंजा)

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-२०१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा मासोद, ता. कारंजा येथील शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग सुरू असून सदरहू शाळेपासून १०० मीटर अंतरावरील जिल्हा परिषदेचे शाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी चे कक्ष सुरू आहेत. सदरहू बाब नियमबाह्य असल्याने त्यासंदर्भात चौकशी करण्यात यावी, असे निर्देश गट प्रमुख यांनी दिले. सदरहू शाळेची इमारत जीर्ण असल्याने तिच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दिनांक ३० जून, २०१८ रोजी जिल्हा स्तरावर पाठविण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका यांनी समितीला दिली. सदरहू शाळेचा वजनकाटा खराब झाला असल्याने नवीन वजनकाटा ग्रामपंचायतीमार्फत १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खरेदी करण्याची सूचना गट प्रमुख यांनी केली. सदरहू शाळा प्रशासनाकडून नवीन तासिका परिपत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याने त्यासंदर्भात गट शिक्षण अधिकारी यांना माहिती विचारली असता ती त्यांना देता आली नाही. सदरहू बाब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची असल्याने समितीने त्याची गंभीर नोंद घेतली असल्याचे गट प्रमुख यांनी नमूद केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा (पंचायत समिती, कारंजा) :-**

उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग सुरू असून सदरहू शाळेपासून १०० मीटर अंतरावरील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी चे कक्ष नियमबाह्यरित्या सुरू असल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली आहे. शैक्षणिक सत्र २०१६-२०१७ मध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दि. ०२/०७/२०१३ अन्वये अंतराच्या अटीत असलेले प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आले होते. परंतु त्यानंतर बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी, अनुदानित, अंशतः अनुदानित इ.सर्व) नवीन शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे त्या अनुषंगाने शाळामधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णय २८/०८/२०१५ (परिशिष्ट क्रमांक ७.१) मधील पृष्ठक्रमांक ३ वरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये याआधीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असल्याचे नमूद आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/१२/२०१३ (परिशिष्ट क्रमांक ७.२) अन्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये राज्यातील सर्व व्यवस्थापन सर्व माध्यम, सर्व परीक्षामंडळे, खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांसाठी संबंधित प्राधिकरण व सक्षम अधिकारी अनुक्रमे जिल्हा परिषद व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना घोषित करण्यात आले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय २८/०८/२०१५ (परिशिष्ट क्रमांक ७.१) अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांना इ. ५ वी व इ. ८ वी चे वर्ग जोडण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., वर्धा यांच्या स्वाक्षरीचे पत्र २६१/२०१६, दिनांक ०५/०७/२०१६ अन्वये कार्यवाही करणेस्तव सर्व गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना देण्यात आले होते.

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांच्या अहवालान्वये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा, मासोद येथे स्थानिक स्वराज्य संस्थेचे इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी चे वर्ग सुरू होते. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांचे पत्र क्र.२६१/१६, दिनांक ०५/०७/२०१६ अन्वये इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी जोडण्याबाबतचे निर्देश प्राप्त झाले. त्याअनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती, मासोद यांनी ठराव क्र. ४३, दिनांक १८/०४/२०१७ अन्वये ठराव घेऊन सन २०१७-१८ पासुन इयत्ता ८ वी चा वर्ग सुरू केलेला आहे. जिल्हा परिषद शाळेमध्ये इयत्ता ६ वी इयत्ता १० वी चे नियमबाह्य असे कोणतेही वर्ग सुरू नाहीत. तसेच खाजगी संस्थेची इयत्ता ६ वी ते इयत्ता १० वी पर्यंतची सावित्रीबाई फुले, मासोद ही खाजगी अनुदानित शाळा सुरू आहे.

सक्षम प्राधिकारी तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., वर्धा यांचे आदेशपत्रानुसार इयत्ता ८ वी चा वर्ग सुरू करण्याबाबतची कार्यवाही स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने केलेली असल्याने पंचायत समिती, कारंजा अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा, मासोद येथे सुरू असलेला इयत्ता ८ वी चा वर्ग नियमबाह्य नाही. त्यामुळे संबंधितांविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच अशाच प्रकारची writ petition No. ३८९३/२०१७ हायकोर्ट नागपूर येथे दाखल झाली असता निकाल दिनांक २६/०३/२०१८ अन्वये विभागाकडून निर्णय झालेला आहे.

करीता मूळ परिच्छेद व त्याअंनुषंगाने आवश्यक दस्तऐवजासह केलेले अनुपालन सादर करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** यु-डायस प्रणालीनुसार मासोद, ता. कारंजा, जि. वर्धा येथे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तसेच सावित्रीबाई फुले विद्यालय, मासोद या खाजगी संस्थेची (इयत्ता ६ वी ते १० वी) शाळा सुरू आहेत. सबब, वेगळ्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा, मासोद, ता. कारंजा प्रकरणात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

यावर अपर मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा व जिल्हा परिषद शाळा या एकमेकांपासून १०० मीटर अंतरावर आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारांचा वापर करून जिल्हा परिषद शाळेमध्ये आठवीचा वर्ग सुरू केला होता. जवळ असलेल्या शाळेमध्ये तो वर्ग सुरू असताना जिल्हा परिषद शाळेमध्ये आठवीचा वर्ग सुरू का केला, याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी म्हणून असा नवीन वर्ग सुरू करण्याचा त्यांना अधिकार आहे. सदर प्रकरण हे माननीय न्यायालयामध्ये गेले. माननीय न्यायालयानेदेखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याबाजूने निकाल दिलेला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ८ ते १० ऑगस्ट, २०१८ या कालावधीत वर्धा जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, कारंजा अंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले विद्यालयात इयत्ता ८ वी चे वर्ग असताना १०० मीटर अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत इयत्ता ८ वी चे वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. याबाबतची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले. तसेच या जिल्हा परिषदेच्या शाळेत नवीन तासिका परिपत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याने त्यासंदर्भात गट शिक्षणाधिकारी यांना कोणतीही माहिती समितीस देता आली नाही. सदरहू बाब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत असल्याने समितीने याची गांभिर्याने नोंद घेतली. समितीच्या असेही निदर्शनास आले की, सदरहू जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत जीर्ण झालेली असल्याने त्या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दिनांक ३० जून, २०१८ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून समितीस सादर करण्यात आलेली माहिती व यासंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३१/१२/२०१३ रोजीच्या शासन निर्णय अन्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करून १०० मीटर अंतरावर सावित्रीबाई फुले या खाजगी अनुदानित विद्यालयात इयत्ता ८ वी चा वर्ग असताना जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत इयत्ता ८ वी चे वर्ग सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर प्रकरण न्यायालयात गेले असता मा. न्यायालयानेदेखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बाजूने निकाल दिलेला आहे. त्यामुळे समितीने या प्रकरणाबाबत समाधान व्यक्त केले.

शिक्षकांनी वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रमाची पूर्तता करून त्यानुसार टाचण नोंदवही परिपूर्ण ठेवणे आवश्यक आहे. गट शिक्षणाधिकारी व शिक्षणविस्तार अधिकारी यांनी उद्दिष्टानुसार शाळांना भेटी देऊन पंचायत समिती अंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती, दैनंदिन अध्यायन व अध्यापनात विद्यार्थीप्रति वाव देणे, मासिक नियोजनाप्रमाणे अध्यापन करण्यात येणे, यासह विद्यार्थ्यांना स्वतंत्र शौचालय व पिण्याचे पाणी इत्यादी व अन्य सोयीसुविधा उपलब्ध करून देणे याबाबतची सर्व संबंधितांद्वारा तपासणी होणे अनिवार्य असून त्रुटींची पूर्तता करणे आवश्यक आहे, असे

समितीचे मत आहे. तथापि, सदरहू जिल्हा परिषदेच्या शाळेत नवीन तासिका परिपत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याने याबाबतची माहिती गट शिक्षणाधिकारी यांना समितीस देता आली नाही. यावरून स्पष्ट होते की, गट शिक्षणाधिकारी यांनी उद्दिष्टानुसार शाळांना भेटी दिलेल्या नाहीत. **यास्तव संबंधित गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून खुलासा घेण्यात यावा व प्राप्त खुलाशानुसार त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**तसेच सदरहू जिल्हा परिषदेची इमारत जीर्ण झालेली असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा विचार करता व त्यांच्या जीवितास कोणतीही हानी पोहचू नये याकरिता या इमारतीच्या दुरुस्तीबाबत शासनाकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावावर तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट - “ अ ”
# शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट क्रमांक ७.१)**

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणे बाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१५

वाचा - १ ) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : एसएसएन १०९१/२५७९/ माशि-१, दिनांक ३०.११.१९९१
२ ) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : एसएसएन १०९६/६०००/ माशि-१, दिनांक २०.०४.१९९६
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : माशाअ -२००८/ (९१८/०८)/ माशि-१, दिनांक २.०४.२००९
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : माशातु -२०१३/(१०७/१३)/ माशि-१, दिनांक २०.११.२०१३
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : पीटीआर -१११३/ (१/२०१३)/ एसएम-४, दिनांक १३.१२.२०१३
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.संकीर्ण-२०१४/(१७७/२०१४)/एसएम-४, दि.२७.६. २०१४

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्याच्या सन २०१५ च्या वित्तीय स्थितीविषयक श्वेतपत्रिकेनुसार राज्यात १ ते १० आणि ० ते २० मुले असलेल्या सर्व शाळांची संख्या आणि त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलांची दुसरीकडे सोय करण्याची शक्यता यासाठी शाळांची इष्टतम आवश्यकता तपासणे आवश्यक आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक इत्यादी शाळांची संरचना विहित करणे तसेच प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी चे वर्ग सुरु करणे इत्यादी बाबींचा निर्णय संदर्भाधीन क्रमांक (१) येथील आदेशान्वये घेण्यात आला होता. तसेच राज्यातील माध्यमिक शाळांना नवीन तुकडया मंजूर करणे, सुरु ठेवणे व टिकविणे बाबतचे निकष संदर्भाधीन क्र.(२) येथील आदेशान्वये विहित करण्यात आले होते. तथापि या आदेशांमध्ये संदिग्धता निर्माण झाल्याने त्यात बदल करण्याबाबत व अधिकाधिक स्पष्टता येण्यासाठी या सर्व निकषांचा आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करण्यासाठी मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र.(३) येथील आदेशान्वये समिती नेमण्यात आली होती. या समितीने सर्व निकषांबाबत विचारविनियम करुन आवश्यक अहवाल शासनास सादर केला तसेच सदर अहवाल शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन याबाबत सर्व नागरीकांकडून हरकती व सूचना सादर करणे बाबत आवाहन करण्यात आले होते. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा ) यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेला अहवाल तसेच

राज्यातील विविध संघटना, संस्था, नागरिक, लोक प्रतिनिधी यांचेकडून प्राप्त हरकती/सूचना विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारीत करणे, नवी शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे, शाळांच्या संरचनेमध्ये बदल करणे, तुकडी मंजूर करणे, टिकवणे इ. बाबतचे निकष विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच केंद्र शासनाच्या बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत एका शिक्षकाने ३० विद्यार्थ्यांना शिकवणे अपेक्षित आहे. हे ३० विद्यार्थी एकाच वर्गातील असावे असे नाही. कायद्यात अशी तरतूद करत असताना शिक्षक बहुवर्ग अध्यापक राहील हे अपेक्षिले गेले आहे. शिक्षक तसेच समाजाने हे समजून घेणे आवश्यक आहे की, प्रत्येक विद्यार्थी विशिष्ट असतो. त्याचे विचार, भावना तसेच शिकण्याची गती वेगळी असते. त्यामुळे ३० विद्यार्थी एकाच वर्गाची दिसत असले तरी त्यांच्या शिकण्याच्या पातळया ३० वेगवेगळया स्तरावर असतात. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना एकाच वर्गात आहेत म्हणून " एकाच स्तरावर समजून " सारखे शिकवता येणार नाही. असे बारकावे समजून न घेता शिक्षण सुरु राहिल्यास काही विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहून सुध्दा शिकू शकणार नाहीत. त्याची प्रचिती आजच्या शिक्षण व्यवस्थेत प्रकर्षाने जाणवत आहे. अशा प्रकारे बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन जमत नसल्याने आलेल्या अपयशाचे दोषारोपण शिक्षण हक्क कायद्यातील काही तरतूदींवर केले जात आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पुढील प्रमाणे सुधारित निकष विहित करण्यात येत आहेत.

शिक्षण हक्क कायद्यामध्ये विषय शिक्षणा एवढेच समाजीकरणाला महत्व दिले गेले आहे. वयानुरुप शाळा प्रवेश, सह शिक्षण ( विद्यार्थी-विद्यार्थीनींचे सोबत शिक्षण ), त्याच वर्गात एका पेक्षा अधिक वर्षे न ठेवण्याचे नियम तथा अपंग समावेशित शिक्षण याचे ठळक उदाहरण आहेत. त्यामुळे स्पष्ट परिभाषित केले नसले तरी प्रत्येक शाळेत प्रत्येक वयोगटाचे किमान काही विद्यार्थी अपेक्षित आहेत. आदर्श स्थितीत प्रत्येक प्राथमिक शाळांच्या प्रत्येक वर्गामध्ये ३० विद्यार्थी तर उच्च प्राथमिक शाळांच्या प्रत्येक वर्गामध्ये ३५ विद्यार्थी परिभाषित आहेत.

विविध कारणानी राज्यात काही शाळांच्या वर्गामध्ये एक सुध्दा विद्यार्थी नाही तर काही शाळांमध्ये एखाद्या वर्गात ८० च्या घरात विद्यार्थी आहेत. मात्र ज्या शाळांमध्ये प्रत्येक वर्गात अत्याधिक विद्यार्थी आहेत तेथे अतिरिक्त वर्ग खोल्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक आले तरी त्यांना वेगळी वर्गखोली उपलब्ध होणार नाहीत. याउलट शहरी भागात आणि काही मोठया गावांत एकच संस्था किंवा विविध संस्थांच्या एका पेक्षा अधिक अनुदानित शाळा आहेत, शिक्षण हक्क कायद्यानुसार ज्या दोन शाळा अंतराच्या निकषाच्या आत आहेत आणि तेथे विद्यार्थ्यांची संख्या सुध्दा कमी आहे, अशा शाळांमध्ये कमी विद्यार्थी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या समाजीकरणास कमी वाव मिळतो. त्यामुळे यापैकी काही शाळांमधील विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये समायोजित करणे योग्य राहील. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९५/२०१० प्रकरणी दि.१२.४.२०१२ रोजी दिलेल्या निकालान्वये सदरचा अधिनियम वैध ठरवला असल्याने सदर निकालातील परि.८ चे अवलोकन होणे आवश्यक आहे.

> 8. By virtue of the 2009 Act, all schools established prior to the commencement of the said Act are thus obliged to fulfill the norms and standards specified inter alia in Sections 25, 26 and the Schedule of that Act. ( See Section 19 (2)). The State is also expected to first weed out those schools which are non-performing, or under-performing, or non-compliance schools and upon closure of such schools, the students and the teaching and non-teaching staff thereof should be transferred to the neighbourhood school. The provisions is meant not

only to strengthen the latter school by adequate number of students but to consolidate and to impart quality education due to the addition of teaching staff. Needless to observe, that if there is inadequate response to the government funded school, it is but appropriate that either the divisions thereof or the school itself be closed and the students and the staff of such schools be transferred to a neighbourhood school by resorting to Section 18 (3) of the 2009 Act. Only after taking such decisions could the School Development Plan represent the correct position regarding the need of government aided schools in every locality across the State. Besides, it will ensure proper and meaningful utilization of public funds. In absence of such exercise, the end result would be that on account of existing non-performing or under-performing or non-compliance schools, the School Development Plan would not reckon that locality for establishment of another school. In our view, even the State Government (s), by resorting to the provision of the 2009 Act, must take opportunity to re-organise its financial outflow at the micro level by weeding out the non-performing or under-performing or non-compliance schools receiving grant-in-aid, so as to ensure that only such government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue, to achieve the object of the 2009 Act of not only providing free and compulsory education to the children in the neighbourhood school but also to provide quality education. Thus, there is a power in the 2009 Act coupled with the duty of the State to ensure that only such government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue with the object of providing free and compulsory education to the children in the neighbourhood school. Validity and applicability of the 2009 Act qua unaided non-minority schools.

उपरोक्त सर्व बाबींची आवश्यकता विचारात घेऊन विद्यार्थी संख्येचे निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. नवीन शाळा सुरु करणे, तुकड्या सुरु करणे, विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संख्या निश्चित करणे (PTR) याबाबतचे संदर्भाधीन शासन निर्णय व याआधीचे सर्व शासन निर्णय जे या निर्णयाशी विसंगत असतील ते अधिक्रमित करण्यात येत असून शासन आता पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय दिनांक २ जुलै,२०१३ अन्वये १ ली ते ४ थी च्या शाळांना ५ वा तर १ली ते ७वी च्या शाळांना ८ वा वर्ग जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे १२,०२७ शाळा १ली ते ५वी आणि ५,७८९ शाळा १ली ते ८वी च्या झाल्या आहेत. तरी सुध्दा २०१४-२०१५ च्या U-DISE प्रमाणे राज्यात चौथा वर्ग असलेल्या शाळा ८४,१९८ तर पाचवा वर्ग असलेल्या शाळा ५५,५८४ आहेत. त्यात २८,६१४ ची तफावत आहे, ग्रामीण भागात ही तफावत २६,७९८ असून काही मोठी गावे सोडल्यास इतर ठिकाणी विद्यार्थ्यांना १ किमीच्या आत ५ व्या वर्गाचे शिक्षण मिळत नसल्याची शक्यता आहे.

याचप्रमाणे १३,२२८ ग्रामीण भागातील शाळा जेथे फक्त सातवा वर्ग आहेत तेथे विद्यार्थ्यांना ३ किमी च्या आत उच्च प्राथमिक शिक्षण मिळत नसण्याची शक्यता आहे. राज्यातील शिक्षण हक्क कायद्याची अंमजबजावणी काटेकोरपणे व्हावी या दृष्टिने खालील निर्देश देण्यात येत आहे.

**१.१** एखाद्या शाळेचे विद्यार्थी समायोजित करावे लागत नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सर्व शाळा( ग्रामीण आणि शहरी ) मध्ये इयत्ता ५ वी चा आणि इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यात यावा. असे करत असतांना अधिकची वर्ग खोली बांधावी लागत असल्यास सदर

कार्यवाही पुढील टप्प्यांमध्ये करण्यात यावी. स्थानिक स्वराज्य संस्थातंर्गत शाळांची संख्या जास्तीतजास्त असल्यामुळे अशा वर्गखोली बांधण्याचा खर्च त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीतून करावयाचा आहे. सर्व शिक्षा अभियानातून त्या बांधकामाकरीता उपलब्धतेनुसार निधी मंजुर करुन शक्य तितक्या लवकर शाळा खोल्या बांधण्यात याव्यात.

**१.२** वरील प्रमाणे शाळांमध्ये वर्ग जोडल्यानंतर जेथे अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करावे लागणार नाही अशा शाळांचे प्रस्ताव अनुक्रमे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ आयुक्त, महानगर पालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांच्या शिफारशीसह सादर करण्यात यावेत.

**१.३** वरीलप्रमाणे कार्यवाही करुन सुध्दा दुर्गम आणि डोंगराळ भागात काही विद्यार्थ्यांना १ किमीच्या आत इयत्ता ५वी चा वर्ग आणि ३ किमीच्या आत इयत्ता ८वी चा वर्ग उपलब्ध होत नसल्यास अशा मुलांना अशासकीय शाळांमध्ये सामावून घेण्यासाठी अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करावे लागत असल्यास तसे प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावे. मात्र असे अतिरिक्त शिक्षक मंजूर झाल्यानंतर त्या शिक्षकाने वर्ग भरविण्याकरिता त्या शाळेत अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध आहे याची शहानिशा प्रथम करण्यात यावी.

२) बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ मधील तरतुदी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी आल्यास शिक्षक पदे मंजूर करणे/सुरु ठेवणे इत्यादी बाबतचे निकष पुढील प्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

**२.१ प्राथमिक शाळा ( इयत्ता १ ली ते ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी )**

**२.१.१** शाळेमधील सर्व विद्यार्थी मिळून ६० पर्यन्त २ शिक्षक, त्यानंतर वाढ होणाऱ्या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे एक अतिरिक्त शिक्षक.

**२.१.२** एखाद्या प्राथमिक शाळेत वर्ग ३ किंवा ४ किंवा ५ मध्ये एकाच वर्गात कमीत कमी २० पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर त्या त्या वर्गासाठी वेगळे शिक्षक अनुज्ञेय राहतील. मात्र तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे संपूर्ण शाळेत शिकत असलेल्या एका वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची संख्या यासाठी विचारात घ्यावयाची आहे.

**२.१.३** कोणत्याही शाळेत अतिरिक्त शिक्षक पद देय असताना त्या शिक्षकासाठी अतिरिक्त वर्गखोली असणे बंधनकारक राहील. वर्ग खोली नसल्यास शिक्षकाचे जादा पद मंजूर करण्यात येवू नये.

**२.१.४** वर्ग १ आणि २ मध्ये २० पेक्षा अधिक विद्यार्थी असले तरी बहुवर्ग अध्यापन पध्दतीने वर्ग चालवायचे आहेत. त्याप्रमाणे वर्ग ३,४ आणि ५ मध्ये प्रत्येकी २० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास बहुवर्ग अध्यापन पध्दती वापरायची आहे.

**२.२ उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा इयत्ता ६ वी ते ८ वी )**

**२.२.१** नवीन शाळा सुरु होत असल्यास आणि पहिल्या वर्षी फक्त सहावा वर्ग असल्यास ३५ विद्यार्थ्यांसाठी २ शिक्षक (१ विज्ञान/गणित आणि १ भाषा ) अनुज्ञेय राहील.

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास ३ शिक्षक ( १ विज्ञान/गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र ) अनुज्ञेय राहील.

२.२.३ विद्यार्थ्यांची संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय होईल. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

**२.३ माध्यमिक शाळा ( इयत्ता ९वी ते १०वी )**

**२.३.१** नवीन शाळा सुरु होत असल्यास त्यात फक्त ९ वा वर्ग राहील. किमान ४० विद्यार्थ्यांचा निकष राहील व त्यास २ शिक्षक ( १ विज्ञान/गणित +१ भाषा/समाजशास्त्र ) अनुज्ञेय राहील.

२.३.२ सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये इयत्ता ९वी व १० वी चे दोनही वर्ग मिळून ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास ३ (१ भाषा,१ विज्ञान/गणित, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.३.३ नववी किंवा दहावी कोणत्याही वर्गामध्ये ६० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एक शिक्षकाचे जादा पद अनुज्ञेय होईल व चाळीशीच्या पटीने विद्यार्थी संख्येस १ शिक्षक अनुज्ञेय राहील.

२.३.४ मात्र, सुरुवातीच्या तीन शिक्षकांपेक्षा अतिरिक्त शिक्षक मंजूर करतांना प्रत्येक शिक्षकामागे एक अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध असणे आवश्यक आहे. अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध नसल्यास अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करु नये.

२.३.५ एखाद्या शाळेत तीन पेक्षा अधिक शिक्षक पद मंजूर झाल्यास इंग्रजी,गणित, विज्ञान, समाजशास्त्र, मराठी, शारिरीक शिक्षण व कार्यानुभव आणि इतर विषयांच्या शिक्षक संख्या समतोल ठेवून पुढची पदे मंजूर करावयाची आहेत.

**२.४ मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांची पदे :-**

**२.४.१ प्राथमिक शाळा (१ ली ते ५ वी )**

**२.४.१.१** विद्यार्थ्यांची संख्या १५० पेक्षा अधिक झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होईल.

**२.४.१.२** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या १३५ पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.५.२ उच्च प्राथमिक शाळा (६वी ते ८वी )**

**२.५.२.१** १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहील.

**२.५.२.२.** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या ९० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.५.३ माध्यमिक शाळा ( वर्ग ९ वी व १० वी )**

**२.५.३.१** १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहील.

**२.५.३.२** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थीची संख्या ९० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

हा शासन निर्णय येण्यापूर्वीच्या निकषाप्रमाणे मान्य झालेल्या मुख्याध्यापकाचे पद अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्या त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये समायोजित करावे. पूर्ण जिल्हयात किंवा त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना शिक्षकांच्या पदामध्ये रिक्त जागेवर समायोजित करावे, परंतु त्यांना वेतन संरक्षण (Pay Protection) देण्यात यावे. अशा अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना जिल्हयात किंवा संस्थेत सेवानिवृत्ती किंवा अन्य कारणाने मुख्याध्यापकाचे पद रिक्त झाल्यास अशा पदावनत लोकांना प्रथम पदोन्नती देण्यात यावी.

**२.६ संयुक्त शाळा -**

(i) वर्ग १ ते ७ (ii) वर्ग १ ते ८ (iii) वर्ग १ ते १० (iv) वर्ग १ ते १२ (v) वर्ग ५ ते १० (iv) वर्ग ६ ते १० (vii) वर्ग ५ ते १२ (viii) वर्ग ६ ते १२ (ix) वर्ग ८ ते १२ (x) वर्ग ९ ते १२

वरील पैकी कोणत्याही प्रकारच्या शाळांमध्ये शाळेचा वेग-वेगळा भाग समजून एकापेक्षा अधिक मुख्याध्यापक पदे अनुज्ञेय ठरत असल्यास फक्त वरिष्ठ शाळेमधील मुख्याध्यापक पद अनुज्ञेय राहणारआहे.

**२.६.१** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या १०० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.७ पर्यवेक्षक / उपमुख्याध्यापकांची पदे** -

उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अथवा ज्या संयुक्त शाळांमध्ये १५ पेक्षा अधिक शिक्षकांची पदे अनुज्ञेय असतील तेथे १ पर्यवेक्षकाचे पद देय ठरेल व शिक्षकांची संख्या ३० पेक्षा अधिक झाल्यास एक अतिरिक्त उपमुख्याध्यापक अनुज्ञेय ठरेल. अशा रितीने १५ शिक्षकांच्या मागे १ पर्यवेक्षकाचे पद मंजूर करावे, तथापि कोणत्याही शाळेत ४ पेक्षा अधिक पर्यवेक्षकांची पदे अनुज्ञेय असणार नाही.

**२.८ इयत्ता ५वी ते १०वी, इयत्ता ५वी ते १२वी, इयत्ता ८वी ते १०वी च्या शाळा**

या शाळांमधून वर्ग ५ किंवा वर्ग ८ कालांतराने बंद होणार आहेत. परंतू त्या शाळेत वर्ग ५ किंवा वर्ग ८ मध्ये २० पेक्षा अधिक मुले असल्यास ते वर्ग बंद न करता ती शाळा तशीच सुरु ठेवावी. त्या परिस्थितीत शिक्षक पद मंजूरीचे निकष खालील प्रमाणे राहील :-

**२.८.१** वर्ग ५ विद्यार्थी संख्या २० ते ३० पर्यंत असल्यास १ शिक्षक अनुज्ञेय राहील. त्यानंतर ३० च्या पटीत १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहतील.

**२.८.२** वर्ग ८ मधील विद्यार्थी संख्या २० ते ३५ पर्यंत असल्यास १ शिक्षक अनुज्ञेय राहील व त्यानंतर ३५ च्या पटीत एक अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहतील.

मात्र वर्ग ५ किंवा वर्ग ८ मध्ये कोणत्याही वर्षी विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी झाल्यास त्या वर्गाना शिक्षकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही

इयत्ता ५वी ते १०वी किंवा ५वी ते १२वी आणि ८वी ते १०वीच्या शाळेमधून ५ व्या किंवा ८व्या वर्गातील सर्व मुलांना इतर शाळांमध्ये एकदा समाविष्ट केल्यानंतर ती शाळा कायमची इयत्ता ६वी ते १०वी किंवा इयत्ता ६वी ते १२वी किंवा इयत्ता ९वी ते १०वी ची होणार आहे.

**२.९ थोडक्यात महत्वाचे :-**

**२.९.१** तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे ज्या-त्या वर्गामध्ये निकषापेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास जादा शिक्षक पद देण्यात येईल. तथापि अशा अतिरिक्त शिक्षकाने वर्ग भरविण्याकरीता त्या शाळेने अतिरिक्त खोली बांधल्यानंतरच ते पद भरण्याची परवानगी देण्यात येईल.

**२.९.२** पुढील काळामध्ये इयत्ता १ली ते ५वी, ६वी ते ८वी किंवा ९वी ते १०वीच्या शाळांना नैसर्गिक वाढ राहणार नाही.

३. उपरोक्त प्रमाणे विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षकांची संख्या मंजूर करताना शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. अशा शिक्षकांना अतिरिक्त ठरविताना संबंधित शाळेमध्ये प्रत्येक विषयाचे शिक्षक उपलब्ध राहतील आणि आरक्षण धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच शिक्षकांच्या समायोजनाबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियमावली, १९८१ मधील तरतूदी आणि त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले प्रचलित निकष कायम राहतील.

४.     सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५०८२८१५३६१७४४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO

Digitally signed by KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS,CID - 920022, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
Date: 2015.08.28 15:44:40 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई,
३) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
४) प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
५) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय,मुंबई,
६) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,
७) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
८) शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
९) शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
१०) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१३) सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
१४) खाजगी सचिव, मा.मंत्री शालेय शिक्षण,मंत्रालय,मुंबई,
१५) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवडनस्ती, ( टीएनटी-२ )

**(परिशिष्ट क्रमांक ७.२)**

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९.**

राज्यातील सर्व शाळांसाठी (इ. १ ली ते १२ वी) पर्यंत स्थानिक प्राधिकरण व सक्षम प्राधिकारी घोषित करणे व त्यांच्या जबाबदा-या निश्चित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः** आरटीई २०१३/प्र.क्र.२०/प्राशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

तारीखः ३१ डिसेंबर, २०१३

**प्रस्तावना -**

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाच्या धोरणानुसार राज्य शासनाने सर्व दूरवर सुमारे १ लाख प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. सद्य:स्थितीत हया शाळांमध्ये सुमारे २ कोटी मुलांना (इ. १ ली ते १२ वी चे ) शिक्षण देण्यात येत आहे.

२. राज्यात खाली दर्शविल्याप्रमाणे निरनिराळया व्यवस्थापनामार्फत चालविल्या जाणाऱ्या या शाळांमध्ये वेगवेगळया वर्गांचा समावेश असून त्यांचेवर निरनिराळया अधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण ठेवले जात आहे :

(अ) खालीलप्रमाणे कमीत कमी ६ व्यवस्थापनाच्या शाळा कार्यरत

(I) शासकीय

(II) स्थानिक स्वराज्य संस्था

a जिल्हा परिषद

b महानगरपालिका

c नगरपालिका

d कटक मंडळे इ.

(III) खाजगी व्यवस्थापन - अनुदानित

(IV) खाजगी व्यवस्थापन - विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित इ.

(ब) इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षणाला वेगवेगळया परिस्थितीमध्ये प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संबोधण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १ | इ. १ ली ते ४ थी चे वर्ग असणारी शाळा | प्राथमिक |
| २ | इ. १ ली ते ७ वीचे वर्ग असणारी शाळा | उच्च प्राथमिक |
| ३ | इ. १ ली ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | माध्यमिक |
| ४ | इ. १ ली ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | उच्च माध्यमिक |
| ५ | इ. ५ ली ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | माध्यमिक |
| ६ | इ. ५ ली ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | उच्च माध्यमिक |
| ७ | इ. ८ ली ते १० वीचे वर्ग असणारी शाळा | माध्यमिक |
| ८ | इ. ८ ली ते १२ वीचे वर्ग असणारी शाळा | उच्च माध्यमिक |

**(क)** ग्रामीण व शहरी भागात असणाऱ्या विविध व्यवस्थापनांच्या शाळांवर विविध अधिकाऱ्यांचे संनियंत्रण असते. जिल्हा परिषदांच्या शाळांवर प्रामुख्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,विभागीय शिक्षण उपसंचालक संनियंत्रण करतात. महानगरपालिकांच्या शाळांवर प्रशासन अधिकारी व आयुक्त (महानगरपालिका ) सनियंत्रण करतात. अशा प्रकारे एका शाळांवर अनेक अधिका-यांचा सनियंत्रण असते. या वस्तुस्थितीमुळे हया शाळांबाबतीत अनेक विषयांवर संभ्रमाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. उदा. :- महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त व प्रशासन अधिका-याचा संबंध केवळ महानगरपालिकेच्या स्वत:च्या शाळेपुरताच मर्यादित राहतो. खाजगी / जिल्हा परिषद शाळांवर त्यांचे नियंत्रण नगण्य असते. खाजगी शाळांकडे कोणीही पुरेसे लक्ष देत नाही. तसेच ग्रामीण भागात जिल्हा परिषद फक्त त्यांच्या शाळांकडे लक्ष देतात. व इतर व्यवस्थापनाच्या शाळा दुसऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे असे समजून लक्ष घालत नाहीत. व्यवस्थापननिहाय शाळांवर नियंत्रणासाठी स्पष्टतेचा अभाव असल्यामुळे शाळांची आवश्यकतेप्रमाणे तपासणी न होणे व परिणामत: गुणवत्तेकडे दुर्लक्ष अशा बाबी आढळल्या आहेत.

३. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व जागतिक स्तराचे समाजपयोगी शिक्षण मिळावे यासाठी गेल्या काही वर्षात केंद्र व राज्य शासनाने खालीलप्रमाणे महत्वाचे निर्णय घेतले आहेत :-

(I) भारतीय राज्य घटनेमध्ये सन २००२ साली दुरुस्ती करुन ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण त्यांचा मुलभूत हक्क करण्यात आला आहे.

(II) केंद्र पुरस्कृत "**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९**" नुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना (इ. १ ली ते ८ वी पर्यंत) मोफत व सक्तीचे शिक्षण नजीकच्या शाळेद्वारे (१ व ३ कि.मी.) उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त करण्यात आले आहे.

(III) कायम विना अनुदान तत्वावर नवीन शाळा इ. सुरु करण्यासंदर्भात राज्य शासनाने "**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२**" पारीत केला आहे. इत्यादी

४. **"अधिनियम,२००९"**नुसार"school"ची व्याख्या **"any recognized school imparting elementary education (कलम-२ (n))"** अशी आहे. या व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, ज्या शाळांमध्ये (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक) इ. १ ली ते ८ वी पैकी कमीतकमी एक वर्ग सुरु असेल त्या संपूर्ण शाळेला

**"अधिनियम, २००९"** च्या तरतूदी पूर्णपणे लागू आहेत. राज्यामध्ये हे तत्व जवळजवळ १०० टक्के शाळांना लागू होणार आहे. कारण बहुतांशी १२ वी पर्यंत शिक्षण देणा-या सर्व शाळांमध्ये इ.१ ली ते ८ वी पैकी कमीत कमी एक वर्ग आहे.

५. **"अधिनियम, २००९"** मधील काही महत्वाच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत :-

<u>कलम २ (h)</u> - Local authority यांची व्याख्या

<u>कलम (९)</u> **स्थानिक प्राधिकरण यांचे कर्तव्ये**

<u>कलम २९</u> - अभ्यासक्रम (The curriculum) आणि मुल्यमापन कार्यपध्दती (the evaluation procedure) ठरविण्यासाठी विद्या विषयक प्राधिकरण (an academic authority) घोषित करणे.

<u>कलम ३१ व ३२ -</u> बालकांच्या शिक्षण हक्काचे संरक्षण करण्यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (State Commission for Protection of Child Rights) यांच्या जबाबदाऱ्या

६. वरील तरतूदीवरुन स्पष्ट आहे की, राज्य शासनाशिवाय "महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT)" व "राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (SCPCR)" यांना त्याच्याशी निगडीत बाबीसंदर्भात <u>राज्यातील सर्व प्रकारच्या</u> शाळांवर संनियत्रण/मार्गदर्शन करण्याचे अधिकार आहेत.

७. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ९५/२०१० मध्ये दिनांक १२.४.२०१२ रोजी आदेश पारित करताना "**अधिनियम, २००९**" पूर्णपणे वैध ठरविला असून खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

> In our view, even the State Government(s), by resorting to the provision of the २००९ Act, must take opportunity to re-organise its financial outflow at the micro level by weeding out the non-performing or under-performing or non-compliance schools receiving grants-in-aid, so as to ensure that only such government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue, to achieve the object of the २००९ Act, of not only providing free and compulsory education to the children in the neighborhood school but also to provide quality education. Thus, there is a power in the २००९ Act, coupled with the duty of the State to ensure that only such Government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue with the object of providing free and compulsory education to the children in the neighborhood school."

८. या पार्श्वभूमीवर सर्व शाळांवर "अधिनियम, २००९" च्या तरतूदीशी व उपरोक्त परिच्छेदातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाशी सुसंगत प्रभावी संनियंत्रण स्थानिक प्राधिकरण यांचेकडून असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या शाळांसाठी स्थानिक प्राधिकरण तसेच विविध तरतूदीसाठी सक्षम अधिकारी स्पष्ट करणारा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय –**

१. राज्यात १२ वीपर्यंत शिक्षण देणा-या सर्व शाळांमध्ये जेथे इ. १ ली ते ८ वी पैकी कमीतकमी एक वर्ग असेल त्या शाळेला “अधिनियम, २००९” च्या तरतूदी पूर्णपणे लागू राहतील.

२. खालील संस्था त्यांचेसमोर दर्शविलेल्या भौगोलिक क्षेत्रासाठी स्थानिक प्राधिकरण म्हणून राहतील :-

| क्र. | संस्था | क्षेत्र |
|---|---|---|
| I. | महानगरपालिका (Municipal Corporation) | महानगरपालिकाच्या भौगोलिक क्षेत्रासाठी |
| II. | नगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती/ (Municipal Council) कटक मंडळे (Cantonment Board) | नगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती/ कटक मंडळे क्षेत्रासाठी |
| III. | जिल्हा परिषद (Zila Parishad) | ग्रामीण क्षेत्रासाठी |

३. प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाने (Local Authority) त्यांचे भौगोलिक क्षेत्रामध्ये असणा-या सर्व शाळांबाबत (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम/ सर्व परीक्षा मंडळे, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित इत्यादी) “अधिनियम, २००९” च्या कलम-९ प्रमाणे खालील जबाबदारी पार पाडणे आवश्यक राहील.

a. Provide free and compulsory elementary education to every child.
b. ensure availability of a neighborhood school as specified in section 6;
c. ensure that the child belonging to weaker section and the child belonging to disadvantaged group are not discriminated against and prevented from pursuing and completing elementary education on any grounds;
d. maintain records of children up to the age of fourteen years residing within its jurisdiction, in such manner as may be prescribed;
e. ensure and monitor admission, attendance and completion of elementary education by every child residing within its jurisdiction;
f. provide infrastructure including school building, teaching staff and learning material;
g. provide special training facility specified in section 4;
h. ensure good quality elementary education conforming to the standards and norms specified in the schedule;
i. ensure timely prescribing of curriculum and courses of study for elementary education;
j. provide training facility for teachers;
k. ensure admission of children of migrant families;
l. monitor functioning of schools within its jurisdiction; and
m. decide the academic calendar.

उपरोक्त सर्व जबाबदा-या पार पाडतांना शासनाचे प्रचलित निकष / नियम / धोरणे /तरतूदी याचे पालन करणे बंधनकारक राहील.

४ "अधिनियम, २००९" चे विविध कलमातंर्गत विविध शाळांबाबत (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम/ सर्व परीक्षा मंडळे, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित इत्यादी) कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे "सक्षम अधिकारी" ( Competent Authority) राहतील.

| क्र. | क्षेत्र | शाळा | सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| I. | महानगरपालिका (Municipal Corporation) | सर्व | महानगरपालिका आयुक्त |
| II. | ग्रामीण क्षेत्र | सर्व | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| III. | नगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती/ (Municipal Council) कटक मंडळे (Cantonment Board) | स्वत:ची शाळा | मुख्याधिकारी/कंमाडिंग ऑफीसर |
| | | इतर सर्व शाळा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |

५. शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राबविल्या जाणा-या केंद्र व राज्य शासनाच्या विद्यार्थी हिताच्या विविध योजनांच्या (उदा. मध्यान्ह भोजन योजना, आयसीटी, सर्व शिक्षा अभियान, RMSA, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, गर्ल्स हॉस्टेल, मॉडेल स्कूल, अल्पसंख्यांक विकास विभागाने शालेय शिक्षणाशी संबंधित सुरु केलेल्या विविध योजना इ.) प्रभावी अंमलबजावणीसाठी वरील परिच्छेदात नमूद सक्षम अधिकारी काम करतील. त्यांना दिलेल्या भौगोलिक कार्य क्षेत्रात योजनांच्या प्रभावी व सक्षम अंमलबजावणीची जबाबदारी त्यांची राहील.

६. जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक/ निरंतर) हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांचे नियंत्रणाखाली काम करतील. तसेच महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणारे शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी (शिक्षण), महानगरपालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली काम करतील.

७. सदरच्या शासन निर्णयात (इ. १ ली ते १२ वी वर्गाच्या शिक्षण देणा-या सर्व शाळांना (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम/ सर्व परीक्षा मंडळे, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित इत्यादी) लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१०२११५२३२०५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2014.01.02 11:57:01 +05'30'

**ना.उ.रौराळे**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२) मा. मंत्री (शालेय शिक्षण),

३) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण),
४) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
५) मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व),
६) मा. मुख्य सचिव याचे स्वीय सहायक,
७) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
८) सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११) सर्व जिल्हाधिकारी,
१२) सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१४) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
१५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१८) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे,
१९) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
२०) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे,
२१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
२२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
२३) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगर परिषद

# परिशिष्ट - “ ब ”
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१८**

**स्थळ :- जिल्हा परिषद सभागृह, वर्धा**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

श्री. समिर कुणावार, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :-**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**जिल्हा परिषद, वर्धा पदाधिकारी :-**

(१) श्री. नितीन मडावी, अध्यक्ष, जिल्हा परिषद, वर्धा

(२) श्रीमती कांचन नांदुरकर, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, वर्धा

(३) श्रीमती जयश्री गफाट, सभापती, शिक्षण व क्रिडा व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, वर्धा

(४) श्री. मुकेश भिसे, सभापती, कृषि व पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जिल्हा परिषद, वर्धा

(५) श्रीमती सोनाली कलोडे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, वर्धा

(६) श्रीमती निता गजाम, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, वर्धा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग**

(१) श्री. दिपक चौधरी, उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग

(२) श्री. विवेक बोंदरे, सहायक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग

**जिल्हा परिषद, वर्धा**

(१) श्री. अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(३) डॉ. करूणा जुईकर, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए. जिल्हा परिषद, वर्धा

(४) श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, वर्धा

(५) श्री. विपुल जाधव, उप मुख्य कार्यकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वर्धा

(६) श्री. शालीक मेश्राम, उप मुख्य कार्यकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(७) श्री. स. भा. शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(८) श्री. हेमंत गहलोत, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा

(९) श्री. अनिल तेलंग, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वर्धा

(१०) श्री. त. स. शेनवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, वर्धा

(११) श्री. ज. ल. वसावे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१२) डॉ. प्रज्ञा डायगव्हाणे/गुल्हाणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१३) कुमारी अश्विनी भोपळे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१४) डॉ. अजय डवले, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१५) श्री. व्ही. पी. कानवडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१६) श्री. एस. आर. मेश्राम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१७) डॉ. देवानंद सावरकर, शिक्षणाधिकारी (निरंतर), जिल्हा परिषद, वर्धा

(१८) श्री. एस. आर. रामटेके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१९) श्री. एम. डी. बारापात्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी

(२०) श्री. एस. एस. धोत्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, समुद्रपूर

(२१) श्रीमती स्वाती इसामे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वर्धा

(२२) श्री. एस. ए. खरात, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट

(२३) श्री. ए. बी. मरभळ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२४) श्री. व्ही. डी. धापके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आर्वी

(२५) श्री. सुभाष सडमाके, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू

(२६) श्री. उ. म. नंदागवळी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील वर्धा जिल्हा परिषदेशी संबंधित परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## गुरूवार, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१८

## स्थळ :- जिल्हा परिषद, वर्धा

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(६) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(७) श्री. राहुल बोंद्रे. वि.स.स.
(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, वर्धा**

(१) श्री. अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
(३) डॉ. करूणा जुईकर, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए. जिल्हा परिषद, वर्धा
(४) श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, वर्धा
(५) श्री. विपुल जाधव, उप मुख्य कार्यकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वर्धा
(६) श्री. शालीक मेश्राम, उप मुख्य कार्यकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)
(७) श्री. स. भा. शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
(८) श्री. हेमंत गहलोत, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा
(९) श्री. अनिल तेलंग, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वर्धा
(१०) श्री. त. स. शेनवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, वर्धा
(११) श्री. ज. ल. वसावे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
(१२) डॉ. प्रज्ञा डायगव्हाणे/गुल्हाणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा
(१३) कुमारी अश्विनी भोपळे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१४) डॉ. अजय डवले, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१५) श्री. व्ही. पी. कानवडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१६) श्री. एस. आर. मेश्राम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१७) डॉ. देवानंद सावरकर, शिक्षणाधिकारी (निरंतर), जिल्हा परिषद, वर्धा

(१८) श्री. एस. आर. रामटेके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१९) श्री. एम. डी. बारापात्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी

(२०) श्री. एस. एस. धोत्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, समुद्रपूर

(२१) श्रीमती स्वाती इसामे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वर्धा

(२२) श्री. एस. ए. खरात, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट

(२३) श्री. ए. बी. मरभळ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२४) श्री. व्ही. डी. धापके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आर्वी

(२५) श्री. सुभाष सडमाके, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू

(२६) श्री. उ. म. नंदागवळी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक - २ संदर्भात वर्धा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१८**

**स्थळ :- जिल्हा परिषद सभागृह, वर्धा**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. राहुल बोंद्रे. वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग**

(१) श्री. दिपक चौधरी, उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग

(२) श्री. विवेक बोंदरे, सहायक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग

**जिल्हा परिषद, वर्धा**

(१) श्री. अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(३) डॉ. करूणा जुईकर, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए. जिल्हा परिषद, वर्धा

(४) श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, वर्धा

(५) श्री. विपुल जाधव, उप मुख्य कार्यकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वर्धा

(६) श्री. शालीक मेश्राम, उप मुख्य कार्यकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(७) श्री. स. भा. शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(शा.म.मु.) एचबी ३३८०—९ (१५५–३—२०२६)

(८) श्री. हेमंत गहलोत, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा

(९) श्री. अनिल तेलंग, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वर्धा

(१०) श्री. त. स. शेनवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, वर्धा

(११) श्री. ज. ल. वसावे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१२) डॉ. प्रज्ञा डायगव्हाणे/गुल्हाणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१३) कुमारी अश्विनी भोपळे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१४) डॉ. अजय डवले, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१५) श्री. व्ही. पी. कानवडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१६) श्री. एस. आर. मेश्राम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा

(१७) डॉ. देवानंद सावरकर, शिक्षणाधिकारी (निरंतर), जिल्हा परिषद, वर्धा

(१८) श्री. एस. आर. रामटेके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(१९) श्री. एम. डी. बारापात्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी

(२०) श्री. एस. एस. धोत्रे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, समुद्रपूर

(२१) श्रीमती स्वाती इसामे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वर्धा

(२२) श्री. एस. ए. खरात, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट

(२३) श्री. ए. बी. मरभळ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२४) श्री. व्ही. डी. धापके, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आर्वी

(२५) श्री. सुभाष सडमाके, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू

(२६) श्री. उ. म. नंदागवळी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील वर्धा जिल्हा परिषदेशी संबंधित परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(३) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(४) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(५) श्री. निलय नाईक, वि.प.स.

(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :-**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :-**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

(४) डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(५) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग)

(६) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(७) श्री. दे.आ.गावडे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

(८) श्री. म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) श्री. प्र.आ.पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१०) श्री. सं.द.माने, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(११) डॉ.व्ही.पी.भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

(१२) श्री. विजय कुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

(१३) श्री. शरद यादव, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, वर्धा**

(१) डॉ. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सत्यजित बडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. विपुल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. स.भा.शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. प्राजक्ता इंगळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(६) श्री. व्ही.पी.कानवडे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(७) डॉ.वाल्मिक इंगोळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) डॉ.अजय डवले, जिल्हा आरोग्य अधिकारी

(९) डॉ.दिप्ती पाटील, सह संचालक (अता), राष्ट्रीय आरोग्य अधिक्षक

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. कैलास घाडगे पाटील, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(६) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(७) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(८) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

श्री. महादेव जानकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :-**

श्री. माधव नागरगोजे, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव / अधिकारी :-**

(१) श्री. राजेश कुमार, अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. नंद कुमार, अप्पर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना

(३) श्री. दि. रा. डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग

(४) श्रीमती मृदुला देशपांडे, उप सचिव

(५) श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्रीमती प्रज्ञा वाळके, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

**जिल्हा परिषद, वर्धा**

(१) श्री. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(२) श्री. विपुल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(३) श्री. प्रशांत वाघमारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(४) श्री. एच. लाडसे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(५) श्री. व्हि. आर. साबळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(६) श्री. स. भा. रोकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(७) श्रीमती प्राजक्ता इंगळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

(८) सौ. स्मिता खानोलकर, सहायक लेखा अधिकारी, मृद जलसंधारण विभाग

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

सन २०१३-२०१४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(३) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(४) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(५) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(६) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.

(७) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(८) श्री. डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत तिसरा अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.